दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२०९ बुधवार दि.०८ एप्रिल २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-209 Wednesday, Dt.08 April 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बीड जिल्ह्यात ८८ ग्रामपंचायतींची रणधुमाळी, १६ सरपंच आणि ७२ सदस्य पदासाठी होणार संघर्ष

## मस्साजोगकडे मात्र संपूर्ण राज्याचे लक्ष..!

मस्साजोग / अनंत जाधव

बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमधील सदस्य आणि सरपंच यांचे निधन, राजीनामा किंवा अपात्रतेमुळे रिक्त झालेल्या जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम यापूर्वीच निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये रिक्त असलेल्या एकूण अकरा तालुक्यातील ८८ ग्रामपंचायतींसाठी ही पोटनिवडणूक होणार आहे. त्यामध्ये अंबाजोगाई, धारूर, बीड, पाटोदा, परळी, वडवणी, माजलगाव, गेवराई, शिरूर, आष्टी, केज या तालुक्यातील ग्रामपंचायतीचा समावेश आहे.आजपासून ही निवडणुकीची रणधुमाळी सुरु होत असून निवडणूक लढवू इच्छिणारे उमेदवार ७ ते १३ एप्रिल या कालावधीत आपले नामनिर्देशन पत्र दाखल करु शकणार आहेत.

राज्य पोटनिवडणुकांसाठीचा कार्यक्रम जाहीर करण्याच्या कालावधीत निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा असलेल्या मतदार याद्या यापूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सदरील याद्या संबंधित तालुक्याच्या तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय आणि गावातील तलाठी कार्यालयांच्या सूचना फलकावर डकविण्यात आलेल्या आहेत. दरम्यान, मंगळवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. या निवडणुकीमध्ये मस्साजोगच्या ग्रामपंचायतचा समावेश आहे त्यामुळे मस्साजोगची निवडणूक बिनविरोध होणार की कशी होणार हे दोन ते तीन दिवसात समजणार आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष जिल्ह्यातील मस्साजोगच्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीकडे लागले आहे.

ऑफलाइन अर्ज प्रक्रिया-

१)प्रश्न. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच पदासाठीच्या निवडणूकीसाठी कसा अर्ज करावा

उत्तर. ग्रामपंचायत निवडणूकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया ही ऑफलाइन आहे. तो अर्ज निवडणूक विभागात जमा करावा लागेल.

२)प्रश्न. कुणबी प्रमाणपत्र असेल तर ओबीसी जागेवर अर्ज भरता येईल का

उत्तर. होय, कुणबी प्रमाणपत्र असल्यास ओबीसी जागेवर अर्ज भरता येणार आहे.

३)प्रश्न. जात पडताळणी प्रमाणपत्र नसेल तर अर्ज भरता येतो का

उत्तर. जात पडताळणी प्रमाणपत्र नसेल मात्र त्यासाठी अर्ज केलेला असेल तर त्याची पोहच पावती जोडून अर्ज करता येतो. निवडूण आल्यानंतर ६ महिन्यांत पडताळणी प्रमाणपत्र द्यावे लागते.

कसा आहे ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम-

नामनिर्देशनपत्र सादर करणे: ७ ते १३ एप्रिल. यामध्ये ११ आणि १२ एप्रिल रोजी सुटी आहे.

अर्जाची छाननी: १५ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून छाननी प्रक्रिया पार पडेल.

मतदान: २८ एप्रिल रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान होईल.

निकाल: २९ एप्रिल रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित केला जाईल.

मस्साजोग निवडणुकीकडे लक्ष

राज्यात बहुचर्चेचा विषय बनलेले बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची १६ महिन्यांपूर्वी समाजातील काही समाजकंटक राक्षस वृत्तीच्या लोकांकडून निघृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला १६ महिने झाले आहे. पोट निवडणुकीत

### ग्रा .पं निवडणूकीसाठी आवश्यक कागदपत्रे

या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे मतदार यादीतील नावाची सांक्षाकित प्रत, उमेदवार दुसऱ्या प्रभागातील असल्यास त्या बाबतचा उतारा, उमेदवाराचे वय २१ वर्षे पूर्ण असल्याचा पुरावा, थकबाकी नसल्याबाबतचा ग्रामसेवक यांचा दाखला, शौचालय वापराबाबतचा ग्रामसेवक यांचा दाखला, २ पेक्षा जास्त अपत्य नसल्याबाबतचा दाखला, अतिक्रमण नसल्याबाबतचा दाखला, अशी कागदपत्रे असणे गरजेचे.



### निवडणुकीसाठी पैसे आल्याच्या चर्चेला उधाण ?

नुकतीच बीड जिल्ह्यातील ८८ ग्रामपंचायतच्या पोट निवडणुकीसाठी जिल्ह्यात रणधुमाळी सुरू झाली आहे या ८८ ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीमध्ये मस्साजोग येथील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचा समावेश आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवाराकडून हालचालींना वेग आलेचे पाहायला मिळत आहे. व गावातील ग्रामस्थांमध्ये या निवडणुकीसाठी परळी मधून पैसे आलेचे ग्रामस्थांमध्ये संभ्रम निर्माण होऊन चर्चेला उधाण आले आहे. नेमके पैसे कोठून आणि कोणाकडे आले आहे ते अद्याप स्पष्ट झाले नाही.त्यामुळे इच्छुक उमेदवाराकडून अफवा पसरली जात नाही? असा सवाल मस्साजोग ग्रामस्थांमध्ये उपस्थित होत आहे.

### धनंजय देशमुख यांच्याशी चर्चा...

दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्याशी चर्चा केली असता धनंजय म्हणाले रणनीती काहीच नाहीये जे काम दिवंगत सरपंच संतोष अण्णा देशमुख यांनी केली आहे. तोच मानस सर्व गावकऱ्यांचा असणार आहे, यापुढेही तसंच काम आणि आज पासून जी पोटनिवडणुकीची सुरुवात आहे तर मागच्या काही दिवसापासून सर्व आजी-माजी जेष्ठ लोक आणि युवक यांचे काय मत आहे. त्या मतावर जे देशमुख कुटुंबीय आहे. त्यांचे काय विचार आहेत व त्यांच्या काही सूचना आहेत त्यावरच आम्ही थांबल्यालो आहेत .आणि येणाऱ्या एक किंवा दोन दिवसात या निवडणुकीच्या गोष्टी स्पष्ट होतील. गावातील आजी माझी व ज्येष्ठ लोक आहेत आणि मागच्या २०२२ च्या निवडणुकीमध्ये जे पॅनल प्रमुख होते ते आणि जे सदस्य झालेले आहेत ते सर्व लोक गावामध्ये जमून निवडणूक बिनविरोध व्हावी आणि जो राहिलेला अठरा महिन्यांचा ग्रामपंचायतचा कालावधी आहे तो स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांना श्रद्धांजली आणि आदरांजली म्हणून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न गावकऱ्यांचा राहिल अशी प्रतिक्रिया संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दिली आहे.

---

### इन बॉक्स



## केसापुरी येथे आचार्य पवित्र सागरजी महाराजांचा अवतरण दिवस उत्साहात साजरा

बीड /प्रतिनिधी

मराठवाड्याचे भूषण, वात्सल्य मूर्ती व प्राचीन तीर्थांचे उद्धारक श्री १०८ आचार्य पवित्र सागरजी महाराज यांचा अवतरण दिवस आज बीड जिल्ह्याच्या माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथे भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

## मराठवाड्याच्या रेल्वे प्रश्नासाठी खा.डॉ.कल्याण काळे सरसावले रेल्वेमंत्र्यांकडे केली ही मोठी मागणी

### समर स्पेशल गाड्या आणि जालना-छपरा एक्सप्रेस पुन्हा सुरू करण्यासाठी ई-मेल द्वारे साकडं रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू.

छ. संभाजीनगर विशेष प्रतिनिधी-शेख फारुक :-

मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या हक्कासाठी आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता जालना-छत्रपती संभाजीनगरचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.विभागात रेल्वे प्रवाशांची होणारी परवड थांबवण्यासाठी त्यांनी थेट केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे धाव घेतली असून विशेष समर स्पेशल गाड्यांसह बंद पडलेली छपरा एक्सप्रेस तत्काळ सुरू करण्याची धडाकेबाज मागणी केली आहे.प्रवाशांचा जीव टांगणीला



गाड्या वाढवण्याची गरज एप्रिल ते जून या काळात मराठवाड्यातून मुंबई,नाशिक, मडगाव,सुरत,अहमदाबाद आणि कोल्हापूर यांसारख्या शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या लाखांच्या घरात असते. सध्याच्या गाड्यांमध्ये पाय ठेवायलाही जागा मिळत नसून आरक्षणासाठी प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे.

## पुरुषोत्तम मंदिर परिसरात गुत्तेदाराने केलेले अतिक्रमण तात्काळ हटवा अन्यथा आमरण उपोषणाचा ईशारा

**भाविकांच्या ये-जा करण्यास अडथळे निर्माण,ग्रामपंचायत कडे निवेदनाद्वारे तात्काळ कारवाईची मागणी**

माजलगाव /प्रतिनिधी

श्रीक्षेत्र पुरुषोत्तम पुरी येथील प्राचीन पुरुषोत्तम मंदिर परिसरात गुत्तेदाराकडून करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे स्थानिक ग्रामस्थ आणि भाविकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. मंदिराच्या आवारात मोठ्या प्रमाणावर बांधकाम साहित्य टाकून जागा व्यापण्यात आली असून, मंदिर परिसरातील मोकळीक पूर्णपणे कमी झाल्याने भाविकांच्या ये-जा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत.



यासंदर्भात उमेश गोळेकर, गोविंद गोळेकर, सतीश कोरडे व सुनील थोरात यांनी ग्रामपंचायत कार्यालय, पुरुषोत्तम पुरी येथे सविस्तर निवेदन देऊन तातडीने अतिक्रमण हटवण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मंदिराच्या आवारात सध्या मोठ्या प्रमाणावर बांधकामाचे मटेरियल साठवण्यात आले असून, मंदिराच्या मागील बाजूस पत्र्याचे शेड व रूम उभारण्यात आले आहेत. यामुळे मंदिराच्या मूळ परिसराचा वापर बाधित झाला आहे.

विशेष म्हणजे, येत्या १७ मेपासून अधिक मासास सुरुवात होत असून या कालावधीत लाखो भाविक श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनासाठी येणार आहेत. अशा

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

जा.क्र./न.प./सा.बां.वि./१७६//२०२६ दि.०७/०४/२०२६

### जाहीर सुचना २०२६-२७

देगलूर नगर परीषद हद्दीतील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ७१/२०१३ मधील दिलेल्या निर्देशानुसार देगलूर नगर परीषद हद्दीतील मुख्य रस्ते व इतर रस्ते यावरील खड्डे, मॅनहोल्स व रस्ते खुदायीबाबतच्या तक्रारीसाठी कार्यालयीन वेळेत लिखित अर्ज अथवा कार्यालयीन मेल आयडी codegloorgmail.com किंवा क्यु आर कोड लिंक https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSdUw-8yweyySSeaPvQvzF-JaCfTpVaP ROLR3nZPytUUq3vpsg/viewform?usp=publish-editor अथवा IWBP प्रकल्पांतर्गत तक्रार निवारण मोड्यूल (Grievance Redressal Mechanism) https://mahaulb.in/MahaULB/index अथवा टोल फ्री क्रमांक १८००२३३१७१० अथवा व्हॉट्सॲप क्रमांक ९७६६९७२९२३ यापैकी कोणत्याही माध्यमाद्वारे तक्रार दाखल करता येईल.

स्वाक्षरित/-
(निलम कांबळे)
मुख्याधिकारी
देगलूर नगरपरिषद देगलूर

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी महावितरणची आर्थिक पुनर्रचना

## महावितरणचा आयपीओ येणार, कृषी वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र वितरण कंपनी

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) कंपनीचे औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती व इतर सर्व बिगर कृषी ग्राहकांसाठीची वितरण संस्था आणि कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एमएसईबी सोलार ग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) असे विभाजन करून दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास मान्यता

बिगर कृषी वितरण क्षेत्रातील महावितरण या कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. महावितरण कंपनीने विविध पायाभूत योजनांसाठी घेतलेल्या सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी आहे. या कर्ज दायित्वापोटी महाराष्ट्र शासन पंधरा वर्षे मुदतीचे दीर्घकालिन सरकारी रोखे जारी करणार आहे. यामुळे महावितरणवरील कर्जाचा बोजा कमी होऊन आर्थिक स्थिती आणखी चांगली होण्यास मदत होणार आहे.

आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी पुनर्रचना राज्यातील ग्राहकांना ऊर्जा सुरक्षा आणि गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणची आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी ही पुनर्रचना करण्यात येणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील बाजारपेठीय संधीचा लाभ घेण्यासाठी अशा दोन कंपन्यांची निर्मिती केली जाईल. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शिफारशी तसेच मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना २.० च्या धोरणात्मक उद्दिष्टानुसार एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड ही कंपनी ३१ मे २०२३ रोजी स्थापन करण्यात आली आहे. या कंपनीच्या माध्यमातून शेतीसाठीच्या वीज पुरवठ्याचे नियोजन आणि सौर ऊर्जेवर आधारित कृषि ऊर्जा प्रणाली विकसित करण्यासाठी संस्थात्मक आधारभूत रचना निर्माण होणार आहे.

राज्यातील वीज वितरण व्यवसाय दोन स्वतंत्र कंपन्यांकडून

महावितरणाच्या आर्थिक पुनर्रचनेनंतर राज्यातील वीज वितरण व्यवसाय दोन स्वतंत्र कंपन्याकडून केले जाईल. यात कृषी वितरण संस्था म्हणजेच एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड-एमसएएपीएल कंपनी केवळ कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देईल. तर अकृषिक वितरण संस्था म्हणजेच महावितरण औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती आणि इतर बिगर कृषी ग्राहकांना सेवा पुरवेल. या दोन्ही कंपन्यांचा वीज विक्री, महसूल व खर्चाचा तपशील यांचा लेखा-जोखा स्वतंत्रपणे मांडला जाईल. विभाजनानंतर सहा ते नऊ महिन्यांच्या कालावधीत महावितरण आयपीओ आणला जाईल. त्यासाठी सेबीकडे आवश्यक त्या मंजुरी व वित्तीय प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. महावितरणचा आयपीओ - नवीन समभाग (फ्रेश इश्यू) आणि शासनाकडील समभाग विक्री (ऑफर फॉर सेल) याद्वारे आणला जाईल. यामुळे महावितरणाला विस्तारासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होईल. यातून स्मार्ट मिटरिंग व डीजिटल वितरण प्रणाली, ऊर्जा संक्रमणाशी संबंधित गुंतवणूक, वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण हे करता येणार आहे.

नवीन स्थापन होणाऱ्या कृषी वितरण कंपनी एमएसएपीएलला सुरूवातीचे भांडवल म्हणून अडीच हजार कोटी रुपयांचे उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

कृषि तसेच औद्योगिक, घरगुती ग्राहकांना स्थिर व अखंडित वीज

या दोन्ही कंपन्यांच्या स्थापनेमुळे कृषी तसेच औद्योगिक, घरगुती ग्राहकांना स्थिर व अखंडित वीज पुरवठा उपलब्ध करून देता येणार आहे. विशेषत: शेतकऱ्यांना दिवसा व अखंडित वीज पुरवठा मिळणार आहे. कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी आवश्यक सौर ऊर्जिकरणाला चालना मिळणार आहे. औद्योगिक ग्राहकांना स्थिर व अखंडित वीजपुरवठा, दरवाढीवरील ताण कमी होणार, हरित ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहन मिळेल. तसेच घरगुती ग्राहकांसाठी वीज दरांमध्ये अधिक स्थिरता येईल, सेवा गुणवत्तेमध्ये सुधारणा, डीजिटल बिलिंग व ग्राहक सेवा अधिक सक्षम होणार आहे.

## संपादकीय....

### न्यायालय हस्तक्षेप करेल

केरळमधील शबरीमला मंदिरात महिलांना प्रवेश देणारा आदेश कायम ठेवावा की नाही, यावर सर्वोच्च न्यायालयाचे नऊ न्यायाधीशांचे घटनापीठ आज या प्रकरणाची सुनावणी करत आहे.हे प्रकरण शबरीमला प्रकरणाची पुनर्सुनावणी आहे की केवळ संदर्भित सात प्रश्नांची उत्तरे देण्यापुरतेच मर्यादित असेल यावर वकिलांमध्ये चर्चा सुरू आहे. न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या जर एखादे सामाजिक दुष्कृत्य धार्मिक प्रथेच्या नावाखाली केले जात असेल तर न्यायालय सामाजिक दुष्कृत्य आणि आवश्यक धार्मिक प्रथा यांच्यात फरक करू शकते. केंद्र सरकारने उत्तर दिले, घटनात्मक दृष्टिकोनातून, याचे उत्तर कलम २५(२)(ब) मध्ये आहे, म्हणजेच संसद यावर कायदा करू शकते.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २ जानेवारी २०१९ रोजी बिंदू कनकदुर्गा (४५) आणि बिंदू अम्मिनी(४६) यांनी पोलिसांच्या संरक्षणात शबरीमला मंदिरात प्रवेश केला. त्या असे करणा-या पहिल्या महिला होत्या. दोघींनी मंदिरात जाण्यासाठी पारंपरिक काळे कपडे परिधान केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २ जानेवारी २०१९ रोजी बिंदू कनकदुर्गा(४५) आणि बिंदू अम्मिनी (४६) यांनी पोलिसांच्या संरक्षणात शबरीमला मंदिरात प्रवेश केला. त्या असे करणा-या पहिल्या महिला होत्या.

दोघींनी मंदिरात जाण्यासाठी पारंपरिक काळे कपडे परिधान केले होते. खरं तर, धार्मिक स्थळांवर महिलांसोबत होणा-या भेदभावाच्या मुद्यावर सुरू असलेल्या या सुनावणीत, शबरीमला व्यतिरिक्त, सर्वोच्च न्यायालय मशिदींमधील महिलांचा प्रवेश, दाऊदी बोहरा समाजातील महिलांची सुंता आणि इतर धर्मांमध्ये विवाह करणा-या पारशी महिलांना धार्मिक स्थळांमध्ये प्रवेशाचा अधिकार द्यावा की नाही, यावरही निर्णय घेणार आहे.

**जाहीर प्रगटन पेपर**
**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ५४४/२०२६**
**सीएनआर क्रमांक एमएचबीआय०२०००७१०५७२०२६**
**द्रोपदाबाई अशोक सातपुते व ईतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. के. के. नागरगोजे)**

अर्जदार :-

१. द्रौपदाबाई सौ. अशोक सातपुते, वय-४३ वर्षे, व्यवसाय-घरकाम, आर. नेक्नूर, जिल्हा बीड, एच.एम. आयआयटी मेन गेट, मारुती नगर, झोपडपट्टी, जी.एल. कंपाऊंड, आयआयटी मुंबई

२. समीक्षा भ्र. नागनाथ कांबळे, वय-२५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. २०७५, आग्रा रोड, गणेश मंदीराजवळ, गायत्री नगर, भिवंडी दांडेकरवाडी ठाणे

३. प्रतीक्षा पि.अशोक सातपुते, वय-२२, व्यवसाय-घरकामगार, रा. नेकानूर ता. जि. बीड, ह.मु.आय.टी. मेन गेट, मारुती नगर, झोपडपट्टी जीएल. कंपाऊंड, आय.आय.टी. मुंबई

४. आदिनाथ पि. अशोक सातपुते, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात अशोक पि. सदाशिव सातपुते यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत अशोक पि. सदाशिव सातपुते यांचा मृत्यु दिनांक १०/०१/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ या मयताच्या मुली व अर्जदार क. ४ हा मयताचा मुलगा आहे. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत अशोक पि. सदाशिव सातपुते यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०७/०५/२०२६

आज दिनांक ०६ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**सह.दिवाणी न्यायालय**
**व.स्तर,बीड**

## आज माजी आ. रावसाहेब अंतापूरकरांच्या पुण्यस्मरणानिमित्त कीर्तन



देगलूर / प्रतिनिधी

माजी आमदार रावसाहेब जयंवतराव अंतापूरकर यांच्या पुण्यस्मरणा निमित्त अंतापूर (ता. देगलूर) येथील त्यांच्या समाधिस्थळी ८ व ९ एप्रिल रोजी कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार (ता.८) रोजी रात्री ८ ते १० या वेळेत श्रावण महाराज जगताप यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवार (ता.९) रोजी दुपारी १२ वाजता गुलाल कार्यक्रम होणार असून त्यानंतर दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले असून परिसरातील नागरिक, कार्यकर्ते व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ड्रॉ पद्धतीने ॲड.उषा प्रभाकर आंधळे झाल्या महिला प्रतिनिधी

बीड /प्रतिनिधी

एका महिला वकिलाने दाखल केलेल्या रिट पिटीशन मध्ये न्यायनिवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील सर्व वकिल संघाना असे निर्देश दिले होते की , प्रतेक वकिल संघ कार्यकारिणी मध्ये महिला वकिलांना ३०% प्रतिनिधित्व देण्यात यावे. सदर निर्देशांचे पालन करत जिल्हा वकिल संघ बीड, यांनी वकिल संघात कार्यरत महिलांना कार्यकारिणीत प्रतिनिधित्व देण्यासाठी अर्ज मागवले होते. वकिल संघातील एकूण २२ महिला वकिलांनी यासाठी अर्ज केला होता. आलेल्या अर्जातून लकी ड्रॉ पद्धतीने महिला प्रतीनिधीची निवड करण्यात आली. या ड्रॉ मधे अँड उषा प्रभाकर आंधळे नेहरकर यांची निवड झाली.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५० दि.०७.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अलिम मुसा शेख, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनस अलिम शेख | मुलगा | २४.०४.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४२/२०२६**
**राजेंद्र पि. आश्रुबा गायकवाड वि. निरंक**
**(मार्फत - अँड ए. के. वावरे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे आश्रुबा दगडु गायकवाड, रा. तलवाडा, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २५/०५/२०२५ रोजी तलवाडा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ राजेंद्र पि. आश्रुबा गायकवाड, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. तलवाडा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ अशोक पि. आश्रुबा गायकवाड, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्यूलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत

दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत आश्रुबा दगडु गायकवाड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - ०९/०६/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहीर प्रगटन**
**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३३९/२०२६**
**शमीम शब्बीर शेख** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळवाडी ता.जि.बीड**

पहा.

**शमीम शब्बीर शेख, रा.भेंडा बु. ता.नेवासा जि.अहमदनगर**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन **शमीम शब्बीर शेख** यांचा **दिनांक ०९.०८.१९८३** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे **जन्म नोंद** जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पिंपळवाडी** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून **जन्म** प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **जन्म नोंद** ग्रामपंचायत कार्यालय **रा.पिंपळवाडी ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०६.०४.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ०६.०५.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

पान १ वरुन...

**केसापुरी येथे आचार्य ....**

सुमारे ७८ वर्षांपूर्वी सौ. चंद्रभागाबाई व श्री. नेमिनाथजी यांच्या पोटी जन्मलेले हे मुनीश्री आज संपूर्ण जैन समाजासाठी प्रेरणास्थान ठरले आहे.

आचार्य सन्मती सागरजी महाराज यांच्या पावन हस्ते त्यांना निग्रंथ जैनेश्वरी दीक्षा प्राप्त झाली. त्यानंतर त्यांनी जैनधर्माच्या प्रसारासाठी आणि प्राचीन तीर्थांच्या जीर्णोद्धारासाठी मोठे योगदान दिले आहे.या पावन दिनानिमित्त भाविकांनी गुरुवरांच्या चरणी कृतज्ञतेने नतमस्तक होत त्यांच्या उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

**मराठवाड्याच्या रेल्वे ....**

प्रवाशांचे हे हाल पाहून खासदार डॉ.काळे यांनी या मार्गांवर तातडीने ग्रीष्मकालीन विशेष रेल्वेगाड्या समर स्पेशल रेल्वे गाड्या सुरू करण्याची आग्रही मागणी केली आहे.

जालना-छपरा एक्सप्रेससाठी विशेष आग्रह

जालना हे औद्योगिक शहर असल्याने येथे उत्तर भारतातील कामगार मोठ्या प्रमाणावर आहेत.मात्र जालना ते छपरा बिहार दरम्यान चालणारी ०७६५१/०७६५२ छपरा एक्सप्रेस बंद असल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.ही गाडी पुन्हा नियमित झाल्यास कामगार आणि व्यावसायिकांना थेट प्रवासाची सोय होईल.हा मार्ग छत्रपती संभाजीनगर,मनमाड, इटारसी, जबलपूर आणि वाराणसी असा ठेवल्यास रेल्वेच्या तिजोरीतही मोठी भर पडेल असा विश्वास खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केला आहे.

खासदारांचा ई-मेल द्वारे थेट

खासदार डॉ. शकल्याण काळे यांनी केवळ विनंती न करता, मराठवाड्यातील जनतेच्या समस्या पुराव्यासह रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.रेल्वेने केवळ नफ्याचा विचार न करता प्रवाशांच्या सोयीला प्राधान्य द्यावे अशा स्पष्ट शब्दात त्यांनी आपली भूमिका मांडली आहे.

**बीड जिल्ह्यात ८८...**

मस्साजोगचाही समावेश आहे. आता मस्साजोग ग्रामपंचायत सरपंच पदासाठी दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख ह्या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची ग्रामस्थांमध्ये चर्चा आहे आणि मस्साजोगची निवडणूक बिनविरोध होणार की अन्य कोण व्यक्ती निवडणूक लढविणार हे येत्या दोन ते तीन दिवसात समजणार आहे . त्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष याकडे लागले आहे.

जर राजकीय दृष्टीने विचार केला तर प्रत्येक इलेक्शनचे पोटनिवडणूक असतेच दुर्दैव एवढेच की गावकऱ्यांना पोटनिवडणुकीचा योग यायला नव्हता पाहिजे परंतु आलेल्या योगाला कोणी काय करू शकत नाही. त्याच्यामुळे पोटनिवडणूक होणे ही आहे. जे इलेक्शन प्रक्रिया आहे ते योग्यच आहे. आम्ही सर्व गावच्या ग्रामस्थांची चर्चा करूत सगळ्यांना हात जोडून विनंती करूत जे संतोष अण्णांचं काम होतं त्याचप्रमाणे आपल्याला त्याला जर खरा न्याय मिळायचा असेल तर माणूस जिवंत असताना काहीही गोष्टी करू शकतो पण माणूस मेल्यानंतर गेल्यानंतर त्याच्या कुटुंबाला पाठीमागे कितपत लोकं उभे राहतात त्याच्यावर खूप काही अवलंबून असते आणि खरी मित्रता आणि खरं कार्य जो

पान १ वरुन...

माणूस दुःखामध्ये उभा राहतो तोच योग्य असते हो त्याच्या आत्म्याला वाटेल की मी जे काम केलेले आहे गावासाठी आणि इतर लोकांसाठी कामाची योग्य पावती माझ्या पश्चातही लोकांना दिलेली आहे.तीच कामाची पावती दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नीला बिनविरोध निवडून देऊन संतोष देशमुख यांना श्रद्धांजली ठरणार आहे.

- सहदेव घाटूळ , मा. पं.स.सदस्य , मस्साजोग.

मी सर्व गावातील ग्रामस्थांना हात जोडून विनंती करणार आहे की, येणाऱ्या पोटनिवडणुकीमध्ये दिवंगत संतोष अण्णा देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना सरपंच पदासाठी बिनविरोध निवडून द्यावे आणि निवडून दिले तर राज्यभरात एक चांगला संदेश या बिनविरोध निवडणुकीच्या माध्यमातून पोहोचेल आणि तीच संतोष देशमुख यांना श्रद्धांजली ठरेल.

सुधाकर सोनवणे, ग्रामस्थ. मस्साजोग

**पुरुषोत्तम मंदिर ...**

परिस्थितीत मंदिर परिसरात असलेले अतिक्रमण भाविकांच्या सुरक्षेसाठी व सोयीसाठी मोठा धोका ठरू शकतो. गर्दीच्या वेळी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित गुत्तेदाराने मंदिर परिसरात टाकलेल्या मटेरियलसाठी ग्रामपंचायतीकडे कोणत्याही प्रकारचा कर भरलेला नाही. तसेच, अधिकृत परवानगीशिवाय पत्र्याचे शेड व रूम उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हा संपूर्ण प्रकार बेकायदेशीर असून ग्रामपंचायतीने तातडीने हस्तक्षेप करून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीकडून गुत्तेदाराला नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती ग्रामसेवकांनी दिली. मात्र, गुत्तेदाराकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसून कंपनीला नोटीस पाठवा असे सांगत जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही समोर आले आहे. यामुळे ग्रामपंचायतीच्या अधिकारालाही आव्हान दिले जात असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

श्रीक्षेत्र पुरुषोत्तम पुरी येथे सध्या प्राचीन मंदिराच्या जतन व संवर्धनाचे काम सुरू आहे. मात्र, जुन्या व नवीन बांधकाम साहित्याचा अनियंत्रित साठा मंदिर परिसरातच केल्यामुळे मंदिराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे. धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या ठिकाणी नियोजनशून्य कामकाज होत असल्याने भाविकांकडूनही नाराजी व्यक्त केली जात आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, मंदिर परिसरातील अतिक्रमण तात्काळ हटवण्यात आले नाही, तर ग्रामपंचायत कार्यालय, पुरुषोत्तम पुरी येथे आमरण उपोषण करण्यात येईल. त्यामुळे प्रशासनाने वेळीच योग्य ती कारवाई करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी होत आहे.एकूणच, भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर परिसर मोकळा व सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक असून, संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे ठरत आहे.



## माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यासह मंत्रिमंडळाची उपस्थिती

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.




# पुस्तकोपहार-२०२६ : ज्ञानदानातून वृक्षसंवर्धनाचा संदेश - केन्द्रीय विद्यालय नांदेडची अभिनव पहल

नांदेड :- प्रतिनिधी

पी.एम.श्री.केन्द्रीय विद्यालय द.म.रे. नांदेड येथे पुस्तकोपहार-२०२६ या अभिनव उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ता.२७ मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमाने केवळ ज्ञानदानाचाच नाही तर पर्यावरण संवर्धनाचाही प्रभावी संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपली वापरून झालेली पाठ्यपुस्तके,संदर्भ पुस्तके आणि इतर उपयुक्त पुस्तके गरजू विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्याचे आव्हान करण्यात आले. ज्ञान हेच सर्वात सुंदर उपहार हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.विद्यालयात इयत्ता १ ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या जुन्या पण चांगल्या स्थितीत असलेल्या पुस्तकांचे संकलन करून शिक्षकांकडे जमा केले.ही पुस्तके पुढे गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले आहेत.या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ पुस्तकदान नसून वृक्ष संवर्धनालाही चालना देणे हा आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (णछएझ) च्या अहवालानुसार एक टन कागद तयार करण्यासाठी सुमारे २४ झाडे तोडावी लागतात त्यामुळे वापरलेल्या पुस्तकांचा पुनर्वापर केल्यास मोठ्या प्रमाणावर झाडांची बचत होऊ शकते.मागील वर्षी विद्यार्थ्यांनी हजारो पुस्तके दान करून शेकडो झाडे वाचवण्यास हातभार लावला होता तसे यावर्षीही या उपक्रमातून पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान अपेक्षित आहे.

विद्यालयाचे प्राचार्य श्री.अशोक विश्वकर्मा यांनी सांगितले की, पुस्तकोपहार हा केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये दानशीलता, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव निर्माण करणारी एक सुंदर परंपरा आहे.प्रत्येक विद्यार्थ्याने या उपक्रमात सहभागी व्हावे.

मुख्याध्यापक श्री.राम श्रृंगारे यांनी आपल्या मनोगतात नमूद केले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या पुस्तकांचा योग्य उपयोग करून इतरांना मदत करणे ही खऱ्या अर्थाने शिक्षणाची किमया आहे आणि यामुळे ज्ञानाची साखळी अखंडित राहते.कारण पुस्तके ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत.पुस्तकदाना मुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळते,वाचन संस्कृतीला चालना मिळते,संसाधनांचा पुनर्वापर होतो व पर्यावरण संवर्धनास हातभार लागतो.विद्यालय परिवाराने सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आव्हान केले आहे. आपले ज्ञान इतरांसोबत वाटा,जुनी पुस्तके दान करा आणि पर्यावरणाचा मित्र बना हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यालयाचे ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.मितेश हनवते यांनी केले व सर्व शिक्षकांच्या समन्वयाने हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करून मोठ्या प्रमाणावर पुस्तक संकलन घडवून आणले. पुस्तकोपहार- २०२६ हा उपक्रम शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम यांचा सुंदर संगम ठरत असून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरत आहे.

# युद्धबंदीचा प्रस्ताव फेटाळला

तेहरान : वृत्तसंस्था

पश्चिम आशियातील संघर्ष थांबविण्यासाठी पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्की देशांनी मध्यस्थी करीत अमेरिका आणि इराणला ४५ दिवसांच्या तात्पुरत्या युद्धविरामाचा प्रस्ताव दिला होता. मात्र, हा प्रस्ताव धुडकावून लावत इराणने होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला. ना होर्मुझ सामुद्रधुनी खुली होणार, ना युद्धबंदी होणार, असे इराणने म्हटले. त्यावर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हल्ल्याची धमकी दिली.

या प्रस्तावासंदर्भात बोलताना पश्चिम आशियातील दोन अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार हा प्रस्ताव इजिप्त, पाकिस्तान आणि तुर्कीमधील मध्यस्थांनी तयार केला. हे देश संघर्ष थांबविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या मते प्रस्तावात दिलेल्या ४५ दिवसांच्या कालावधीत दोन्ही देशांना कायमस्वरूपी युद्धविरामासंदर्भात सर्वसमावेशक चर्चा करण्यास पुरेसा वेळ मिळेल.

हा प्रस्ताव रविवारी रात्री उशिरा इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची आणि मध्य पूर्वेतील अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांना पाठविण्यात आला होता. मात्र, यावर अमेरिकेची प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, इराणने होर्मुझ खुली करण्यास आणि ४५ दिवसांच्या अस्थायी युद्धविरामाला नकार दिला.

या आधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सध्या सुरू असलेल्या मध्य पूर्व आशियातील युद्धाबाबत एक मोठे वक्तव्य केले होते. त्यांनी इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही तर मोठ्या लष्करी कारवाईला सामोरे जावे लागेल अशी धमकी दिली होती. याचवेळी त्यांनी अपशब्द आणि शिवराळ भाषेचाही वापर केला होता. यानंतर आता इराणने ट्रम्प यांच्या या वक्तव्याला आणि ४८ तासाच्या अल्टीमेटमला मजेशीर मात्र ट्रम्प यांची खिल्ली उडवणारे उत्तर दिले. त्यांनी ट्रम्प यांची मागणी धुडकावून लावलीच. त्याचबरोबर ट्रम्प यांची खिल्ली उडवत आमच्याकडून होर्मुझची किल्ली हरवली आहे, असे उत्तर दिले.

इराणच्या अधिका-यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीवर असलेले नियंत्रण कायम राहणार असल्याचे सांगितले. इराणने युद्धात झालेल्या हानीची नुकसानभरपाई दिल्याशिवाय होर्मुझ पुन्हा खुले केले जाणार नाही असे सांगितले. दोन्ही बाजूंकडून माघार घेण्याची कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने हे युद्ध दीर्घकाळ चालण्याची शक्यता आहे. या आधी डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर होर्मुझ खुले करण्यासाठी मोठा दबाव वाढविला. हा मार्ग जागतिक तेल आणि गॅस वाहतुकीचा महत्वाचा मार्ग आहे. त्यांनी मंगळवारपर्यंतचा वेळ दिला असून जर असे झाले नाही तर इराणमधील पॉवर प्लांट आणि वाहतुकीचे पूल यांना टार्गेट करण्यात येईल, अशी धमकी दिली होती.



## शांतता करारासंबंधी होणार होत्या वाटाघाटी

पहिल्या टप्प्यात ४५ दिवसांच्या युद्धविरामाचा प्रस्ताव आहे. या कालावधीत कायमस्वरुपी शांतता करारावर वाटाघाटी होणार असल्याचे म्हटले होते. त्यात वाटाघाटींसाठी अधिक वेळ लागल्यास हा युद्धविराम वाढवला जाऊ शकतो. दुस-या टप्प्यात युद्ध संपविण्यासाठी अंतिम करार केला जाईल, असे प्रस्तावात नमूद करण्यात आले होते. मात्र, इराणने हा प्रस्ताव धुडकावून लावला.

## इराणला रात्रीत उद्ध्वस्त करू, ट्रम्प यांची धमकी

इराणने युद्धविरामाचा प्रस्ताव धुडकावल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत अमेरिका फक्त एका रात्रीत संपूर्ण इराणला उद्ध्वस्त करू शकते आणि ती रात्र कदाचित उद्याची रात्रही असू शकते, अशी थेट धमकी दिली. त्यांच्या या वक्तव्यामुळे पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.इराणच्या हद्दीत कोसळलेल्या अमेरिकन पायलटला वाचविण्यासाठी आतापर्यंतचे सर्वांत मोठे बचाव अभियान राबवण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

# अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी ७५ लाखांचा निधी मंजूर

### दलितेत्तर वस्ती सुधार योजनेअंतर्गत कामांना प्रशासकीय मान्यता नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी सादर केला होता प्रस्ताव

अंबाजोगाई: शहराच्या नागरी पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेतून नगरपरिषदेने प्रस्तावित केलेल्या ७५ लाख १ हजार २७६ रुपयांच्या विविध विकासकामांना बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अधिकृत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या निर्णयामुळे शहरातील अनेक प्रलंबित नागरी कामांचा मार्ग मोकळा झाला असून प्रभाग क्रमांक ४ आणि ८ मधील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आमदार नमिता मुंदडा आणि नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी या विकासकामांसाठी शासन स्तरावर सातत्याने



पाठपुरावा केला होता. नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या पुढाकाराने नगरपरिषदेने सादर केलेल्या या प्रस्तावामुळे शहराच्या नियोजित विकास आराखड्यास गती मिळणार आहे.

या योजनेसाठी बीड जिल्ह्याकरिता एकूण ३५ कोटी ५३ लाख रुपयांचा निधी मंजूर असून त्यापैकी अंबाजोगाई नगरपरिषदेला लोकसंख्येच्या प्रमाणात ४ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, ज्यातील ७५ लाखांच्या पहिल्या टप्प्यातील कामांना ही मंजुरी मिळाली आहे. या मंजूर निधीतून अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील माळी नगर भागात गणेश राऊत ते उंबरकर आणि अर्जुन वाघमारे ते शिनगारे अशा विविध अंतरांवरील सीसी नाली व सीसी रस्त्यांची कामे केली जाणार आहेत. तसेच प्रभाग क्रमांक ४ मधील प्रशांत नगर भागात परशुराम मेहता ते बाळासाहेब इखे यांच्या घरापर्यंत सीसी रोड आणि नालीचे बांधकाम करण्यात येणार आहे. नागरी सुविधांसोबतच प्रशासकीय कामाच्या सोयीसाठी अंबाजोगाई नगरपरिषद कार्यालयाच्या इमारतीवर दुसऱ्या मजल्यावर नवीन हॉलचे बांधकामही या निधीतून प्रस्तावित करण्यात आले आहे.

# गेवराई तालुक्यातील उमापूर येथे दोन अल्पवयीन चुलत बहिणींचे अपहरण

संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल

बीड (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील उमापूर परिसरात दोन अल्पवयीन चुलत बहिणींना फूस लावून पळवून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात



खळबळ उडाली असून पोलिसांनी संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ व १७ वर्षीय दोन मुली ५ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास घरातून अचानक बेपत्ता झाल्या. नातेवाईकांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला; मात्र त्यांचा काहीही मागोवा लागला नाही.

दरम्यान, पीडितांच्या घराजवळ राहणारा विजय महादेव कव्हाळे (रा. पळशी, जि. नांदेड) हा युवकही त्याचवेळी बेपत्ता झाल्याने त्याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. संबंधित युवकानेच दोन्ही मुलींना पळवून नेल्याचा संशय मुलींच्या पालकांनी व्यक्त केला आहे.

पीडित मुलींच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून चकलांबा पोलिस ठाण्यात संशयित युवकाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून विविध पथके तयार करून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

# गॅस टंचाई व दरवाढीविरोधात गेवराईत वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन

गेवराई (प्रतिनिधी) :

गॅस सिलिंडरच्या वाढत्या दरांमुळे व टंचाईमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीतर्फे सोमवारी गेवराई तहसील



कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या धोरणांविरोधातही यावेळी घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. विष्णू जाधव, तालुका अध्यक्ष अजयकुमार गायकवाड आणि जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे यांनी केले. कृत्रिम टंचाई निर्माण करून काही गॅस एजन्सीधारकांकडून काळाबाजार होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर गॅस सिलिंडर ठेवून जोरदार घोषणाबाजी केली. गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे बजेट कोलमडले असून तातडीने दर नियंत्रणात आणावेत, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात जिल्हा सल्लागार सुदेश पोदार,अनिल बोऱ्हाडे, तालुका सरचिटणीस किशोर भोळे,तालुका अध्यक्ष संजय शरणांगत, अजयकुमार गायकवाड, ज्ञानेश्वर हवळे, राजेंद्र साळवे, कृष्णा समसे, प्रदीप शिंदे, नितीन साळवे, दामू डारकोंडे, दशरथ साळवे, महेश काकडे,संतोष साळवे, राम साळवे यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा व सम्यक विद्यार्थी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# बारामती पोटनिवडणूक : सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल

### सभेत अजित पवारांची आठवण काढत भावुक

बारामती (प्रतिनिधी)

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज अधिकृतरित्या उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक बारामतीत पार पडली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे , जय पवार, पार्थ पवार, सुनील तटकरे , नरहरी झिरवळ, दत्तात्रय भरणे, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित



होते.सभेत बोलताना सुनेत्रा पवार या दिवंगत अजित पवार यांची आठवण काढत भावुक झाल्या. दोन महिन्यांपूर्वी अजितदादा आपल्यातून निघून गेले, हे अजूनही खरे वाटत नाही. बारामतीतच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. बारामतीच्या जनतेकडे पाहूनच मला धैर्य मिळते, असे त्या म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या की, बारामतीच्या प्रत्येक कोपऱ्यात अजितदादांचा स्पर्श आहे. या मतदारसंघाची प्रतिष्ठा कमी होऊ देणार नाही. ही निवडणूक माझी नसून बारामतीकरांची आहे. अजितदादांना दिलेल्या पाठिंब्यापेक्षा अधिक पाठिंबा मला मिळेल, असा विश्वास आहे. त्यांनी अजित पवार यांच्या विकासकामांची परंपरा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

बारामती माझ्यासाठी आईसारखी आहे. येथील जनतेला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही, असे आश्वासन देत त्यांनी विकासाचा वेग कायम ठेवण्याची ग्वाही दिली. तसेच शरद पवार यांच्या सुनेच्या नात्याने आणि अजित पवार यांच्या पत्नी म्हणून राज्यकारभार सांभाळण्याची ताकद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# बीडमध्ये अक्सा रेडिमेड कापड दुकानाला भीषण आग लाखोंचे नुकसान

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील करंजा रोड परिसरात मध्यरात्री कापडाच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत दुकानातील कापड व इतर साहित्य पूर्णतः जळून खाक झाले असून लाखों रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, करंजा रोडवरील मोमीन वहिदभाई यांचे 'अक्सा रेडिमेड' हे कापड दुकान मध्यरात्री अचानक पेटले. रात्रीची वेळ असल्यामुळे आग अल्पावधीतच मोठ्या प्रमाणात पसरली. दुकानातील



संपूर्ण कापडसाठा तसेच इतर साहित्य जळून खाक झाले.घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या आगीत दुकानदार वहिदभाई यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

दरम्यान, गटनेते फारूक पटेल, संपादक शेख मुजीब, नगरसेवक अमर नाना नाईकवाडे, नगरसेवक शेख अश्फाक इनामदार, यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी ॲड. सय्यद खाजा, युवा नेते मोमीन खवी (सद्दाम) आदी उपस्थित होते.

# आपण कोणाला दोष द्यायचा नाही आणि कोणाचा द्वेष करायचा नाही नियती सगळे काही नीट करते - धनंजय मुंडे

## भगवानगडाची ऐश्वर्यसंपन्नता महंत डॉ. नामदेव शास्त्रींनी अबाधित राखली - मुंडेंचे बडेवाडी येथील नारळी सप्ताहात विधान









पाथर्डी /प्रतिनिधी

कोणी आपल्याला दोष देवो किंवा आपलं द्वेष करो, आपण मात्र कोणाला दोष द्यायचा नाही किंवा कुणाचा द्वेष करायचा नाही नियती सर्वांचा हिशोब नीट करत असते असे वक्तव्य माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्यावतीने पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे आयोजित अखंड नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात धनंजय मुंडे बोलत होते.

भक्ती, शक्ती आणि विश्वासाची भगवानगडाची परंपरा आहे. लाखो ऊसतोड कामगार आपल्या एक रुपया कमाईतील वीस पैसे देणगी भगवानगडाला देतात आणि त्यातूनच या गडाची महती आज देश विदेशात पोहोचली आहे. ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबांनी भगवान गडाची गादी ही ऐश्वर्या संपन्न बनवली ऐश्वर्या संपन्नतेची ती परंपरा आभारीत राखण्याचे काम आज गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव शास्त्री यांच्यामार्फत केले जात असल्याचे विधानही यावेळी धनंजय मुंडे यांनी केले.

भगवानगड हे आपले ऊर्जा स्थान असून भगवानगडाच्या सावलीत आपल्याला नेहमी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी व्यासपीठावर महंत डॉ. नामदेव शास्त्री, गडाचे उत्तराधिकारी ह. भ. प. कृष्णा महाराज शास्त्री, आईसाहेब संस्थानच्या ह. भ. प. राधाताई सानप, खा. निलेश लंके, आ. मोनिकाताई राजळे, माजी आ. बाळासाहेब आजबे, ड. प्रताप ढाकणे, ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांसह आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आधी बडेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी धनंजय मुंडे यांची जंगी मिरवणूक काढत फुलांची उधळण करत जोरदार स्वागत केले.उमापूर येथे नारायणगडाच्या सप्ताहासही दिली भेट, महंत शिवाजी महाराजांचे घेतले आशीर्वाद दरम्यान बडेवाडी येथे जाण्याअगोदर धनंजय मुंडे यांनी गेवराई तालुक्यातील उमापूर येथे श्री क्षेत्र नारायणगडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थिती लावली. यावेळी गडाचे महंत ह. भ. प. शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी ग्रामस्थानी धनंजय मुंडे यांचे स्वागत केले, यावेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हेही उपस्थित होते.

## रात्रीचे मित्र बनवू नका, सकाळचे मित्र बनवा, व्यसनापासून मुक्त व्हा - श्रीसिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील श्री क्षेत्र महादेव मंदिर खडकेश्र्वर येथील भव्य यात्रेनिमित्त सात दिवसांपासून चालू असलेल्या परमरहस्य पारायण अखंड शिवनाम सप्ताह निमित्त दि.६ रोज सोमवार सातव्या दिवशी महाप्रसादाचे कीर्तन श्री १०८ सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज पलसिध्द मठ साखरखेर्डा जि.परभणी यांचे किर्तन झाले.त्यांनी अतिशय सुंदर असे भक्तांना उपदेश केले.

गुरु प्रसादाची थोरी। महिमा आहे श्रेष्ठ भारी

गुरूचे प्रसाद खुप महत्वाच आहे प्रसादाचे महिमा अनन्यसाधारण असुन तो सहा विकार नाश करतो .भक्तताला परमानंद देतो. गुरुप्रसादामुळे जन्म-मृत्यूचे फेरे चुकतात आणि आत्मसाक्षात्कार होतो. आपण जर प्रसाद ग्रहण केलाततर आपल्या शरीरातील निर्विकार बाहेर पडतात.महाराज पुढे म्हणाले माणसाने माणसाशी माणसासारखं वागावं कोणाचे निंदा करू नये, कुणाची फसवणूक करु नये, आपल्यातुन मिपणा काढुन टाका.जर कोणाचे चांगले करु शकता येत नसेल तर कोनाचे नुकसान करू नका जर तुम्ही फुल होऊ शकत नसाल तर काटे बनुन राहु नका. कलीयुगात चांगले कर्म करणाऱ्यांना मोक्ष प्राप्त होतो.आणि दुष्कर्म करणाऱ्यांना नरकात जावा लागतो.मुलांच्या आई बापाला सुचना आजच्या युगात तरूणांना चांगले संस्कार दिले पाहिजे.तरूण मंडळीला आवर्जून सांगितले की व्यसनापासून दूर रहा.रात्रीचे मित्र बनवु नका.रात्रीचे मित्र घातक ठरवु शकतो आपलं शरीर संपण्याच्या मार्गावर असतं दिवसाचे मित्र बनवा दिवसाचे मित्र हे तुम्हाला साथ देणारे उर्जा देतात व्यायाम,योगा



केल्याने,शरीर मजबुत होतो.आरोग्याची काळजी घ्या आरोग्याने जग जिंकता येतो. म्हणुन रात्रीचे मित्र सोडा दिवसाचे मित्र धरा.एक रहा सेफ रहा असे महाराजांनी युवकांना ठणकावून सांगितले. भक्ती करा, परमार्थ करा, उपसना करा, दानधर्म करा, म्हणजे सुख शांती समाधान लाभते.आज हिंदू धर्म एकत्रित येण्याची गरज आहे.असे सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराजांनी मार्गदर्शन केले. खडकेश्र्वर शंभु महादेव आपणास सुखी ठेवो असा आशिर्वाद भक्तांना दिले.त्यानंतर महाआरती करण्यात आले आणि महाप्रसादाने सप्ताहाचे सांगता झाली. यावेळी गावातील व परिसरातील सर्व गांवकरी मंडळी हजारोंच्या संख्येने भक्त महाप्रसाद व दर्शन घेतले.

## उत्कृष्ट सेवेसाठी पोलीस पाटील मुंडे यांना राज्यपाल पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल बीड पोलीस दलातर्फे अभिनंदन

बीड /प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मौजे पांगरी येथील पोलीस पाटील ज्ञानोबा भगवानराव मुंडे यांची सन २०२५-२६ या वर्षासाठीच्या 'पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ज्ञानोबा मुंडे यांनी बजावलेल्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पोलीस अधीक्षक, बीड तसेच संपूर्ण बीड पोलीस दलाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन व राज्यपाल यांचा हा अत्यंत मानाचा पुरस्कार असून, गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच पोलीस प्रशासनाला वेळोवेळी दिलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल त्यांना हा बहुमान जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठीची निवड प्रक्रिया दिनांक २६ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा पोलीस पाटील पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असून, यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह सर्व समिती सदस्य उपस्थित होते. सदर पुरस्कारासाठी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून विशेष पाठपुरावा करण्यात आला असून, पोलीस अधीक्षक नवनीत कावत व प्रभारी पोलीस उपाधीक्षक (मु.) उमाशंकर कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून तो समितीसमोर सादर करण्यात आला होता. शासनाच्या सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांमधून मुंडे यांच्या एकमेव प्रस्तावास मंजुरी देऊन त्यांची अंतिम निवड करण्यात आली आहे.

सदर विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्काराचे वितरण महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले असून, हा पुरस्कार राज्यपालांच्या वतीने बीड जिल्ह्याच्या सन्माननीय पालकमंत्री यांच्या



हस्ते ज्ञानोबा मुंडे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप पालकमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र व रुपये २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) रोख रक्कम असे आहे.

### नमुना ई-४

[नियम १९ पहा]

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव व पदनाम :** धन्यकुमार बबनसा मोरे, प्रमाणित लेखापरीक्षक, सहकारी संस्था, लातूर विभाग

**सहकारी संस्थेचे नाव :** आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. धारूर, ता. धारूर जि. बीड

नियम ७६-ग द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून उपरोक्त सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता मी धन्यकुमार बबनसा मोरे, प्रमाणित लेखापरीक्षक, सहकारी संस्था, लातूर विभाग आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. धारूर, ता. धारूर जि. बीड यांच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी, याद्वारे आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. धारूर, ता. धारूर जि. बीड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार व जाहीर करीत आहे आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या संबंधातील निवडणुका घेण्याचे नियत करीत आहे.

**अनुसूची** **अंतिम यादी प्रसिद्धी दिनांक ३०.०४.२०२६**

<table>
<tr><th>अ क्र</th><th>मतदार संघाचे नाव</th><th>निवडून द्यावयाच्या जागा</th><th>नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशन पत्रे मिळतील ती जागा)</th><th>नाम निर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करणे</th><th>नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक व वेळ</th><th>वैध नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करण्याचा दिनांक</th><th>उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक</th><th>निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन करण्याचा दिनांक</th><th>मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ</th><th>मतमोजणीचा दिनांक, वेळ व स्थळ</th><th>मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td></td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td><td>८</td><td>९</td><td>१०</td><td>११</td></tr>
<tr><td>१</td><td>सर्वसाधारण</td><td>८</td><td rowspan="6">०८.०४.२०२६ ते १५.०४.२०२६ ११.०० ते १५.००</td><td rowspan="6">०८.०४.२०२६ ते १५.०४.२०२६ १७.०० वा</td><td rowspan="6">१६.०४.२०२६ ११.३० वा.</td><td rowspan="6">१७.०४.२०२६ ११.०० वा.</td><td rowspan="6">१७.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ ११.०० ते १४.००</td><td rowspan="6">०५.०५.२०२६ ११.०० वा.</td><td rowspan="6">१३.०५.२०२६ स. ०८.०० वा. ते १६.०० वा. (ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल.)</td><td rowspan="6">१३.०५.२०२६ मतदानानंतर (ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल.)</td><td rowspan="6">१३.०५.२०२६ मतमोजणीनंतर (ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल.)</td></tr>
<tr><td>२</td><td>महिला प्रतिनिधी</td><td>२</td></tr>
<tr><td>३</td><td>अनुसूचित जाती किंवा जमातीतील सदस्य</td><td>१</td></tr>
<tr><td>४</td><td>इतर मागासवर्गीय सदस्य</td><td>१</td></tr>
<tr><td>५</td><td>विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गातील सदस्य</td><td>१</td></tr>
<tr><td></td><td>एकूण जागा</td><td>१३</td></tr>
</table>

**जाहीर दिनांक ०८.०४.२०२६**

**टीप :-** ०१. मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळू शकेल. ०२.स्तंभ क्र.०३ ते ०८ चे ठिकाण कार्यालय, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर असे राहील. ०३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या चिन्हांच्या यादी मधून निवडणूक चिन्ह निवडावयाचे आहे. ०४. निवडणूक कार्यक्रम शासकीय व सार्वजनिक सुट्ट्या वगळून राहील.

**निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता :** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर, हॉटेल संतकृपा समोर, प्रतिभा नगर केज रोड, धारूर.

**स्वाक्षरीत**
**(धन्यकुमार बबनसा मोरे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.**
**धारूर, ता. धारूर जि. बीड**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सर्व जाती-धर्माला सोबत घेवून चालण्याची नारायण गडाची परंपरा-शिवाजी महाराज

### श्रीक्षेत्र नारायणगडाच्या ७४ व्या नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता ; लाखोंचा जनसागर उसळला

गेवराई : मराठवाड्यात थोर संत महात्म्यांनी जन्म घेवून जगाच्या उद्धारासाठी काम करुन समाजाचे हित साधले. तर सर्व जाती-धर्माला सोबत घेवून चालण्याची श्री क्षेत्र नारायणगडाची परंपरा आहे असे प्रतिपादन श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांनी केले. श्री.क्षेत्र नगद नारायण गडाचा ७४ वा भव्य नारळी सप्ताह गेवराई तालुक्यातील उमापुर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी लाखो भाविकांचा जनसागर महाप्रसाद घेण्यासाठी लोटला होता.

श्री क्षेत्र नगद नारायण गडाचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांचे 'नंदाच्या घराला। मज नेई गोकुळाला ।।१।। माया उपजलीं तेथें । ठेवीं मज आणीं येथें ।।२।।' या अभंगावर भव्य काल्याचे हरीकीर्तन संपन्न झाले. दरम्यान यावेळी माजीमंत्री आ.धनंजय मुंडे, खा. निलेश लंके , आ.विजयसिंह पंडित यांनी सप्ताहाला भेट दिली तर कीर्तनप्रसंगी व्यासपीठावर श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी, माजीमंत्री बदामराव पंडित, नामदेव महाराज शेकटेकर, उत्तराधिकारी संभाजी महाराज, नारायण महाराज, शिवाजी म. गिरी, माजी सभापती युधाजित पंडित, बप्पासाहेब तळेकर, ड.महादेव तुपे , जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नवले, युवा उद्योजक गणेश नलावडे, युवा नेते रोहित पंडित, हभप हरिदास जोगदंड, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अमोल करांडे, मुकुंद बाबर यांसह संत-महंत व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच गडाचे टाळकरी, वारकरी,



गायक , वादक, भजनी मंडळ, विणेकरी तसेच भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना महंत शिवाजी महाराज म्हणाले की, संत नगदनारायण महाराजांची सेवा केल्यानंतर नगद प्रसाद मिळतो. गेल्या आठ दिवसांपासून ग्रामस्थांनी केलेल्या नियोजनामुळे हा सप्ताह न भूतो न भविष्यती अशा प्रकारचा झाला आहे. सर्वांनी एकत्र येवून केला जातो त्याला काला असे म्हणतात. संतांच्या आशीर्वादाने काला घ्यावा तर स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराजांच्या आशीर्वादात खूप मोठी ताकद आहे. त्यांच्या आशीर्वादाने मला त्यांच्या जाग्यावर बसवलं तर सर्वांना सुख मिळावे यासाठी नारळी सप्ताहाच्या धर्म मंडपात ही संतांची प्रतिज्ञा असते. प्रत्येकाने समाजात वावरताना लीन आणि नम्र रहा आणि साधुसंतांचा आशीर्वाद प्राप्त करा. तर तरुणांनी या भक्ती मंडपात येवून भक्तीमय वातावरण अनुभवले , हा भक्ती सोहळा भव्य दिव्य पार पडला तर प्रत्येकाने गाईची आणि आईची सेवा करावी व रामकृष्ण हरी हा नामजप करावा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. या सप्ताहात उमापूर ग्रामस्थांसह मारोतीचीवाडी तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी तन-मन-धनाने सहकार्य केल्याने नारळी सप्ताह मोठ्या उत्साही आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी महिला व पुरुष भाविकांचा जनसागर उसळला होता.

उमापुरकरांचे सुंदर नियोजन ; शिवाजी महाराजांनी केले कौतुक

श्री क्षेत्र नारायणगडाच्या ७४ व्या भव्य नारळी सप्ताहासाठी उमापुर, मारोतीचीवाडी येथील ग्रामस्थ गेल्या सहा महिन्यांपासून नारळी सप्ताहाच्या नियोजनाला लागलेले होते. भव्य धर्म मंडप म्हणजे स्वायत्त कल्याणचे ठिकाण आहे. भव्य सोहळा उमापुर करांनी सार्थकी लावला. आज तुम्ही सर्वांनी तन मन धनानी सेवा केल्याने या वर्षीच्या ७४ व्या नारळी सप्ताहाला आगळेवेगळे स्वरुप प्राप्त झाले . सप्ताह काळात आलेल्या सर्व भाविकांना भोजन आणि पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून गावातील लहान मुलांपासून महिला तसेच आबाल वृद्धांपर्यंत सर्व जण भाविकांच्या सेवेत हजर होते. त्यामुळे सुंदर नियोजन केल्याबद्दल महंत शिवाजी महाराजांनी उमापुरकरांचे कौतुक केले.




# किसान सभेच्या तालुका अध्यक्षपदी बळीराम देशमुख तर सचिवपदी भगवान बडे

### परळी तालुका अधिवेशन उत्साहात संपन्न

परळी / प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्याने परळी तालुक्यात तमाम बीड जिल्ह्यात लढणाऱ्या अखिल भारतीय किसान सभेच्या परळी तालुका अध्यक्षपदी बळीराम देशमुख व सचिव पदी पुन्हा एकदा भगवान बडे यांची निवड करण्यात आली यावेळी ५९ जणांची परळी तालुका कमिटी घोषित करण्यात आली यामध्ये पाच उपाध्यक्ष पाच सहसचिव व एक कोषाध्यक्ष असी रचना करण्यात आली एकंदर या सर्व नवनिर्वाचित तालुका कमिटीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे

तालुक्यातील सिरसाळा येथे संपन्न झालेल्या या अधिवेशनाच्या सुरुवातीला स्वागत अध्यक्ष म्हणून डॉ. श्याम पवार यांनी एकंदर शेतकऱ्यांच्या विरोधातली सर्व राजकीय परिस्थिती आणि सरकारची शेतकरी विरोधी धोरण या संदर्भामध्ये सखोल विश्लेषणात्मक मार्गदर्शन करत अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. अधिवेशनाच्या सुरुवातीला सचिव भगवान बडे यांनी मागील चार वर्षाच्या कामाचा अहवाल मांडला या अहवालावर चर्चा होऊन सर्वानुमते या अहवालाला मंजुरी देण्यात आली यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.ऑड.अजय बुरांडे, सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या १०% आरक्षणासह विविध प्रश्नांबाबत मंत्रालयात महत्त्वाची बैठक

### आमदार सुरेश धस यांचा पाठपुरावा

पाटोदा (प्रतिनिधी): जिल्हा परिषदेमध्ये समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मंगळवारी, ७ एप्रिल २०२६ रोजी मंत्रालयात एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. श्री. जयकुमारजी गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आमदार सुरेश अण्णा धस यांनी उपस्थित राहून कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आग्रही भूमिका मांडली.

१०% आरक्षणाबाबत विशेष बाब म्हणून मंजुरीची मागणी

या बैठकीत आमदार सुरेश धस यांनी प्रामुख्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना १०% आरक्षणाच्या माध्यमातून सेवांतर्गत सर्व लाभ मिळवून देण्यासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याची मागणी केली. ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण विकासाचा कणा म्हणून काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, वेतनश्रेणी आणि इतर सेवाशर्तींबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी अधोरेखित केली.

ठोस पाठपुरावा करण्याचे मंत्र्यांचे निर्देश

बैठकी दरम्यान संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि पदाधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नामदार जयकुमार गोरे यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मकता दर्शवत, कर्मचारी वर्गाच्या हितासाठी योग्य तो निर्णय लवकरात लवकर घेण्याचे आश्वासन दिले. तसेच, या प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा करून तांत्रिक अडचणी दूर करण्याचे निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी कायम कटिबद्ध आहे. त्यांच्या हक्काच्या



१० टक्के आरक्षणासह इतर सर्व मागण्या मान्य होईपर्यंत माझा पाठपुरावा सुरूच राहील. ग्रामीण भागातील प्रशासकीय यंत्रणेचा हा महत्त्वाचा घटक दुर्लक्षित राहणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत.

- आमदार सुरेश अण्णा धस

कर्मचारी वर्गात आशेचे वातावरण

आमदार सुरेश धस यांनी सातत्याने या प्रश्नावर आवाज उठवल्यामुळे आणि मंत्रालयात थेट मंत्र्यांसोबत बैठक घडवून आणल्यामुळे ग्रामपंचायत कर्मचारी वर्गात आनंदाचे आणि आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. लवकरच यावर ठोस शासन निर्णय (ऋ) निर्गमित होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाचे कार्य कौतुकास्पद-राजकिशोर मोदी

### वधु-वर परिचय पुस्तिका प्रकाशन, समाजभूषण पुरस्कार वितरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दिवसेंदिवस बिकट बनत चाललेल्या विवाह समस्ये विषयी जागरूकता निर्माण करीत अनेक विवाह जुळविणाऱ्या योगेश्वरी वधु-वर मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते ०६ एप्रिल सोमवार रोजी योगेश्वरी वधु वर सूचक मंडळाच्या वधु-वर परिचय पुस्तिका प्रकाशन व समाजभुषण पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

अध्यक्षस्थानी राम मंदीर चे मठाधिपती गदाधर बुवा रामदासी होते. व्यासपीठावर अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, दिनदयाळ ना. सह.बँकेचे अध्यक्ष ऍड. मकरंद पत्की,माजी नगरसेवक संजय लोणीकर,ह.भ. प. अंबादास महाराज चिक्षे,योगेश्वरी देवल कमेटीचे संचालक उल्हास पांडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मोदी म्हणाले



की,सामाजिक क्षेत्रात योगेश्वरी वधु-वर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने सामाजिक जबाबदारीचे जे बहुमोल कार्य केले आहे ते अवर्णनीय आहे. त्यांच्या प्रयत्नातून अनेक विवाह जुळले अलिकडच्या काळात वधु वर सूचक मंडळ काळाची गरज बनल्याचे सांगून ज्यांना समाजभुषण पुरस्कार मिळाले त्यांची जबाबदारी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले. मकरंद पत्की म्हणाले की,योगेश्वरी वधु-वर सुचक मंडळाच्या वतीने विवाह जुळविण्याचे काम होते ही आताच्या काळात मोठी गोष्ट असल्याचे सांगून समाजभुषण पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे त्यांनी अभिनंदन केले.अंबादास चिक्षे यांनीही मंडळाचे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगून समाजभूषण पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे अभिनंदन केले.

अध्यक्षीय समारोपात गदाधर बुवा रामदासी यांनी वधु-वर सूचक मंडळाच्या कार्याचे कौतुक करून समाज भुषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. मान्यवरांचे स्वागत बाबुराव बाभुळगावकर,अशोक टाकळकर,राहूल देशपांडे,राजश्री पिपळे,कल्याणी सोनेसांगवीकर,आदींनी केले.प्रास्तविक श्रीपाद चिक्षे यांनी केले संचालन आनंद टाकळकर यांनी तर उपस्थितांचे आभार स्मिता भातलवंडे यांनी मानले.

यावेळी विविध संघटनाचे पदाधिकारी संचालक,महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यांना प्राप्त झाले पुरस्कार अध्यात्मिक कार्य - कमलाकर देशपांडे वधु-वर सूचक मंडळ कार्य-प्रभाकर सेलमोकर सामाजिक कार्य-स्वरूपा कुलकर्णी शैक्षणिक कार्य-एस.डी.खडके

# न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथे नवीन शैक्षणिक सत्राची उत्साहात सुरुवात

### नवीन पुस्तके आणि गणवेशामुळे विद्यार्थ्यांत उत्साह संचारला

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सिबीएसई) संलग्न श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई येथे सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी नवीन शैक्षणिक सत्र २०२६-२७ चा उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी हा पहिला दिवस आनंददायी आणि प्रेरणादायी ठरला. एप्रिल सत्राच्या सुरूवातीला शाळेची घंटा वाजताच विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळेचे आवार पुन्हा एकदा फुलून गेले आहे.

टॉड्लर्स व्हिले पूर्व-प्राथमिक शाळा, मोदी लर्निंग सेंटर, रिंग रोड, अंबाजोगाई या ठिकाणी सुट्ट्यांनंतर बालवाडी विभाग मोठ्या आनंदाने पुन्हा सुरू झाला. चिमुकले विद्यार्थी चेहऱ्यावर हास्य घेऊन शाळेत परतल्यामुळे, शाळेचे वातावरण उत्साह आणि आनंदाने भरलेले होते. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी आणि सौ.डिंपल संकेत मोदी, प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, उपप्राचार्य प्रा.वसंतराव चव्हाण, प्राचार्य डी.एच.थोरात, प्रा.एस.ए.बिराजदार आणि प्रा.राघवेंद्र राजमान्य यांच्या मार्गदर्शनानुसार हा दिवस विशेष आणि स्वागतार्ह बनविण्यासाठी, शिक्षकांनी विद्यार्थ्यांकरिता सुंदर आणि कल्पक कटआउट्स (आकर्षक आकृत्या) तयार केले होते. प्रत्येक विद्यार्थ्याला या रंगीबेरंगी आणि आकर्षक कटआउट्स सोबत सेल्फी काढण्याची संधी देण्यात आली. तसेच प्राचार्य, मान्यवर आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन उत्साहात स्वागत केले. ज्यामुळे हा अनुभव सर्वांसाठीच आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शाळेतील पहिल्याच दिवशी सहज, आनंदी आणि शाळेच्या वातावरणात एकरूप झाल्यासारखे वाटण्यास मदत झाली. तसेच, एका आनंदी आणि उत्साही वातावरणात विद्यार्थी व शिक्षक यांच्यात सुसंवाद साधण्यासही यामुळे प्रोत्साहन मिळाले. एकंदरीत, शाळेच्या पुनरुद्घाटन दिनाचा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला आणि यासह नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात सकारात्मक व चैतन्यमय वातावरणात झाली. या कार्यक्रमाची सुरूवात शाळेचे प्राचार्य, अकॅडमिक संचालक आणि समन्वयक यांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने सरस्वती पूजन करून करण्यात आली. त्यानंतर नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे




आणि जुन्या विद्यार्थ्यांचे सहर्ष स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य पांडुरंग पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिस्त, मेहनत आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच चारित्र्याच्या विकासाला महत्व दिले पाहिजे असे सांगितले. तर अकॅडमिक संचालक विनायक मुंजे यांनी विद्यार्थ्यांना नवीन सत्रात यशस्वी होण्यासाठी प्रेरणा दिली व आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यावर भर दिला. याप्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे हसतमुखाने स्वागत करून त्यांना शाळेच्या नियमांची व अभ्यासक्रमाची माहिती दिली. नवीन सत्राच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, आनंद आणि नवचैतन्य पाहायला मिळाले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अविनाश काटकर यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय केतेश्वरण तसेच शिक्षकांचा परिचय प्रवीण कुमार यांनी करून दिला. या कार्यक्रमात संगीत विभागाचा सहभाग विशेष आकर्षण ठरला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

प्रत्येक मूल स्वतःच्या गतीने बहरू शकेल असे वातावरण :

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ चा उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. इयत्ता १ ली ते १२ वी तसेच टॉड्लर्स व्हिले पूर्व-प्राथमिक शाळेमध्ये आमच्या सर्व नवीन आणि पुन्हा दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या कुटुंबांचे आम्ही मनापासून स्वागत करतो..! न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, टॉड्लर्स व्हिले पूर्व-प्राथमिक शाळेमध्ये आम्ही एक सुरक्षित, प्रेमळ आणि उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन उपक्रम राबवले जाणार आहेत. जिथे प्रत्येक मूल आपल्या स्वतःच्या गतीने बहरू शकेल. आपल्या मुलाच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आमच्यावर सोपवून, आमच्यावर विश्वास दाखविल्याबद्दल आम्ही आपले आभार मानतो. प्रगतीने भरलेल्या एका शानदार वर्षाची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत.

# स्मारक समितीकडून महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती उत्सव ; त्यानिमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन

### स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील महात्मा ज्योतिराव फुले स्मारक समिती अंबाजोगाई यांच्या वतीने रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिराव फुले व संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला. या जयंती उत्सावानिमित्त महात्मा फुले स्मारक स्थळावर शालेय विद्यार्थ्यांसाठी, महाविद्यालयीन तरूणांसाठी तसेच महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.



या संयुक्त जयंती विशेष स्पर्धा महोत्सव २०२६ खालील प्रमाणे होणार आयोजित करण्यात आल्याची माहिती स्पर्धेचे समन्वयक प्रा.मिलिंद ढगे व सचिव रत्नदीप गोरे यांनी दिली आहे. स्पर्धेचे ठिकाण - महात्मा फुले स्मारक समिती महात्मा फुले स्मारक रोड, एल.आय.सी ऑफिसच्या जवळ, अंबाजोगाई (जिल्हा बीड) स्पर्धेचे वयोगट पुढीलप्रमाणे आहेत. बालगट (इयत्ता १ली ते ४ थी) - रंगभरण स्पर्धा दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ सायंकाळी ६ ते ७ वाजता. सहभागी स्पर्धकांना महापुरूषांचे चित्र दिले जाईल चित्रात आकर्षक रंग भरायचे आहेत. स्पर्धकांनी रंग स्वतः घेऊन यावेत. आयोजकांकडून फक्त ड्रॉइंग पेपर दिला जाईल. सामान्यज्ञान स्पर्धा - गट १ (इयत्ता ५ वी ते ८ वी), विषय - जीवनचरित्र, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ दुपारी २ ते ३ वाजता. गट २ (इयत्ता ९ वी ते १२ वी) विषय - सामाजिक व शैक्षणिक कार्य, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ दुपारी ३ ते ४, खुला गट (पालक, माता, गृहिणी, व्यावसायिक व १९ वर्षांवरील) विषय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांचे राष्ट्र उभारणीत योगदान, दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी वेळ सायंकाळी ६ ते ७, महिलांसाठी विशेष स्पर्धा ठेवण्यात आल्या आहेत. ज्यात रांगोळी स्पर्धा, विषय - महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचे रांगोळी रूपात सादरीकरण, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वेळ सकाळी ८ ते ९ वाजता. सदरील स्पर्धेचे वैशिष्ट्ये - समाजप्रबोधनाचा संदेश,

सर्जनशीलतेला प्रोत्साहन, सर्व वयोगटांसाठी संधी उपलब्ध करून देणे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. विजेत्यांस सन्मानचिन्ह व तसेच आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी संपर्क - ९८५०१८९२३७ / ८२७५४८६६४३ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, सचिव रत्नादीप गोरे, उपाध्यक्ष अनिल नरसिंगे, कोषाध्यक्ष संजय साळवे, सुनील नरसिंगे, हेमंत धानोरकर, प्रा.आदित्य कदम, विजय कचरे, रामेश्वर खाडे, भाऊराव गवळी यांनी केले आहे.

# जनतेच्या विश्वासाचा उगवता आधारस्तंभ-अजय दादा धोंडे

## माझी प्रामाणिकता हीच माझी ओळख

आष्टी - (राजेंद्र लाड) बीड जिल्ह्यातील आष्टी-पाटोदा-शिरूर या महत्त्वाच्या मतदारसंघात गेल्या काही वर्षांत ज्या युवा नेतृत्वाने आपल्या सातत्यपूर्ण कार्यातून, जनतेशी असलेल्या घट्ट नात्यामुळे आणि विकासाभिमुख दृष्टीकोनातून विशेष स्थान निर्माण केले आहे, त्या नेतृत्वामध्ये अजय दादा भीमराव धोंडे हे नाव अत्यंत आदराने आणि विश्वासाने घेतले जाते. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या घराण्यात जन्माला आल्यामुळे राजकारणाचा वारसा लाभला असला, तरी त्या वारशाला साजेशी कार्यतत्परता, जनसेवेची निष्ठा आणि आधुनिक विचारांची सांगड घालत अजय दादांनी स्वतःचे स्वतंत्र, ठळक आणि प्रभावी नेतृत्व उभे केले आहे.

अजय दादा धोंडे यांचा प्रवास हा केवळ राजकीय क्षेत्रापुरता मर्यादित नसून तो सर्वांगीण सामाजिक बांधिलकीचा आदर्श नमुना आहे. त्यांच्या कार्यात एक सातत्य, एक समर्पण आणि एक प्रामाणिकपणा दिसून येतो. आष्टी परिसरातील लहानात लहान गावापासून ते मोठ्या शहरापर्यंत त्यांनी लोकांशी थेट संवाद साधण्याची परंपरा निर्माण केली आहे. गावोगावी भेटी देताना ते केवळ औपचारिकता पार पाडत नाहीत, तर प्रत्येक नागरिकाच्या समस्या मनापासून ऐकून घेतात. शेतकऱ्यांच्या अडचणी, विद्यार्थ्यांच्या गरजा, महिलांच्या समस्या, बेरोजगार युवकांचे प्रश्न या सर्व मुद्द्यांवर ते संवेदनशीलतेने विचार करतात आणि त्या समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी संबंधित यंत्रणांशी सातत्याने पाठपुरावा करतात.राजकीय कार्यात त्यांनी अभ्यासपूर्ण दृष्टिकोन ठेवला आहे. कोणत्याही विषयावर मत मांडताना त्यामागे ठोस माहिती, आकडेवारी आणि वास्तव परिस्थितीचा विचार असतो. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला एक बौद्धिक आधार लाभला आहे.



मतदारसंघाच्या विकासासाठी त्यांनी पाणीपुरवठा योजना, रस्त्यांची उभारणी, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सेवा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी त्यांनी अनेक पातळ्यांवर प्रयत्न केले आहेत. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक कामांना गती मिळाल्याचे नागरिकांकडून सांगितले जाते.

युवक हा समाजाचा कणा आहे, या विचारावर ठाम विश्वास ठेवून अजय दादांनी युवकांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. क्रीडा स्पर्धा, करिअर मार्गदर्शन शिबिरे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा यांसारख्या कार्यक्रमांद्वारे त्यांनी युवकांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक तरुण त्यांच्या संपर्कात येऊन प्रेरित झाले आहेत आणि समाजकारणात सक्रिय सहभाग घेऊ लागले आहेत. अजय दादांचे व्यक्तिमत्त्व हे युवकांसाठी एक प्रेरणास्थान बनले आहे. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शिष्यवृत्तीविषयी मार्गदर्शन, शाळा व महाविद्यालयांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. शिक्षण हेच खरे सामर्थ्य या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी सातत्याने काम केले आहे.

सामाजिक क्षेत्रात त्यांच्या कार्याचा व्याप खूप मोठा आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता अभियान, गरजू कुटुंबांना आर्थिक व वस्तूरूप मदत, नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतीचा हात अशा अनेक उपक्रमांमधून त्यांनी समाजाशी असलेली आपली बांधिलकी जपली आहे. विशेषतः संकटाच्या काळात ते लोकांच्या मदतीला धावून जातात, ही त्यांची ओळख बनली आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांशीही त्यांची नाळ घट्ट जोडलेली आहे. गावोगावी होणाऱ्या यात्रा, उत्सव, हरिनाम सप्ताह, कीर्तन, भजन कार्यक्रमांमध्ये त्यांची उपस्थिती असते. या कार्यक्रमांद्वारे ते समाजात एकात्मता, बंधुभाव आणि सांस्कृतिक मूल्ये टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या सहभागामुळे या कार्यक्रमांना नवे बळ आणि उत्साह मिळतो. अजय दादा धोंडे यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा साधेपणा आणि माणुसकीचा दृष्टिकोन. ते कोणत्याही व्यक्तीशी अत्यंत आपुलकीने वागतात. पद, प्रतिष्ठा किंवा राजकीय स्थान यांचा कोणताही अहंकार त्यांच्या वागण्यात दिसत नाही. त्यामुळेच सामान्य माणूस त्यांच्याशी सहज संवाद साधू शकतो. त्यांच्या या गुणांमुळेच ते जनतेच्या मनात विशेष स्थान मिळवू शकले आहेत. त्यांच्या नेतृत्वातून आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात विकासाची नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. आगामी काळात ते अधिक जोमाने, अधिक व्यापक दृष्टिकोनातून आणि अधिक प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. अजय दादा हे केवळ आजचेच नव्हे, तर उद्याचेही सक्षम नेतृत्व म्हणून उदयास येत आहेत. दि. ९ एप्रिल हा त्यांचा वाढदिवस असून, या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव करत संपूर्ण मतदारसंघातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होणार आहेच. अजय दादा, आपल्या नेतृत्वातून समाजात आशा, विश्वास आणि विकासाची नवी दिशा निर्माण होत आहे. आपण असेच जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत राहावे, आपल्या सर्व संकल्पना यशस्वी व्हाव्यात, आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड यश लाभावे, हीच मनःपूर्वक शुभेच्छा..!!!

# फत्तेवडगावच्या कु.झुंबर आश्रुबा काळे यांची महसुल सहायक मंत्रालय पदावर निवड

## जिद्द,मेहनत आणि चिकाटीचे यशस्वी फळ

आष्टी - (राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील फत्तेवडगाव येथील कु. झुंबर आश्रुबा काळे हिने आपल्या अथक परिश्रम, जिद्द आणि प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर टॅक्स असिस्टंट तसेच मंत्रालयातील महत्त्वाच्या सहाय्यक पदावर निवड मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे फत्तेवडगावसह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



कु. झुंबर काळे या आश्रुबा काळे यांची कन्या असून फत्तेवडगावचे सरपंच नानासाहेब काळे यांची पुतणी आहेत. साध्या कुटुंबातून येत असताना तिने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत आपली वाटचाल सुरू ठेवली. लहानपणापासूनच अभ्यासू, जिज्ञासू आणि मेहनती स्वभावामुळे ती शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली. शालेय व महाविद्यालयीन जीवनात तिने सातत्याने उत्तम गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. स्पर्धा परीक्षांच्या कठीण आणि आव्हानात्मक प्रवासात तिने अनेक अडचणींवर मात केली. दीर्घकाळ नियमित अभ्यास, वेळेचे अचूक नियोजन, विविध विषयांवरील सखोल आकलन आणि आत्मविश्वास या गुणांच्या जोरावर तिने ही स्पर्धा यशस्वीपणे पार केली.

टॅक्स असिस्टंट पदासाठी देशभरातून हजारो उमेदवार स्पर्धा करीत असताना त्यात आपली निवड करून तिने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तिच्या या यशामागे कुटुंबाचा भक्कम पाठिंबा, आई-वडिलांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची जिद्द यांचा मोठा वाटा आहे. कठीण प्रसंगातही खचून न जाता सातत्याने प्रयत्न करत राहणे हेच तिच्या यशाचे खरे गमक असल्याचे तिच्या जवळच्या व्यक्तींनी सांगितले. कु. झुंबर काळे हिच्या या यशामुळे फत्तेवडगावातील युवक-युवतींमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत नवचैतन्य निर्माण झाले आहे. तिच्या यशातून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थी आता उच्च ध्येय ठेवून अभ्यासाकडे वळत आहेत. गावातील सामाजिक व शैक्षणिक वातावरणाला तिच्या यशामुळे सकारात्मक चालना मिळाली आहे.

या यशाबद्दल फत्तेवडगाव ग्रामस्थ मंडळी, विविध सामाजिक संघटना, शिक्षकवर्ग, मित्रपरिवार तसेच नातेवाईकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. अनेक मान्यवरांनी तिच्या घरी भेट देऊन तिचा सत्कारही केला. तिच्या पुढील वाटचालीसाठी उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत. भविष्यात अधिक उच्च पदांवर कार्य करत समाजासाठी योगदान देण्याची तिची इच्छा असून प्रशासनात प्रामाणिकपणे काम करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा तिचा निर्धार असल्याचेही तिने व्यक्त केले आहे. कु. झुंबर आश्रुबा काळे हिच्या या यशामुळे फत्तेवडगावच्या इतिहासात अभिमानाची नोंद झाली असून हा क्षण संपूर्ण गावासाठी प्रेरणादायी आणि गौरवास्पद ठरला आहे. अशी माहिती कु. झुंबर काळे यांचे चुलते तथा स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे संचालक आप्पासाहेब काळे यांनी दिली.

# कऱ्हेवडगाव येथे सरपंच परिवंत गायकवाड यांच्या शुभहस्ते महापूजा

## आष्टी शहरात दोन हजार भाविकांना महाप्रसाद

आष्टी - (राजेंद्र लाड) सर्वसामान्यांचे आराध्य दैवत असलेल्या हनुमंतरायाचा जन्मोत्सव आष्टी तालुक्यात अत्यंत उत्साहात, भक्तीभावाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. तालुक्यातील गावोगावच्या हनुमान मंदिरांमध्ये पहाटेपासूनच कीर्तन, अभिषेक, पूजा-अर्चा आणि महाप्रसादाच्या कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि जय हनुमान च्या घोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.



कऱ्हेवडगाव येथे हनुमान जयंतीनिमित्त गावचे सरपंच परिवंत गायकवाड यांच्या शुभहस्ते श्री मारुतीरायाची विधिवत महापूजा व महाअभिषेक संपन्न झाला. पहाटेच्या मंगलमय वातावरणात पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली. यावेळी गावातील ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला. दरवर्षीप्रमाणे यंदाही कऱ्हेवडगाव येथे हा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. पूजेनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मोठ्या भक्तीभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर परिसराला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. या रोषणाईमुळे संपूर्ण परिसर अधिकच उजळून निघाला असून वातावरणात पावित्र्य आणि उत्साहाची अनुभूती येत होती.

दरम्यान आष्टी शहरातही हनुमान जयंतीचा उत्साह मोठ्या प्रमाणावर दिसून आला. शहरातील पोलीस स्टेशन शेजारील हनुमान मंदिर, व्यापार पेठेतील मंदिर तसेच शेकापूर रस्त्यालगत असलेल्या मानाच्या दक्षिणमुखी मारुती मंदिरात पहाटे नेमक्या ६ वाजून २२ मिनिटांनी जय हनुमान च्या जयघोषात जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी मंदिर परिसर भक्तांनी गजबजून गेला होता.

पोलीस स्टेशन शेजारील हनुमान मंदिरात जयंतीनिमित्त विशेष पूजा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी दर्शनासाठी आलेल्या सुमारे दोन हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सुव्यवस्थित नियोजनामुळे मोठ्या गर्दीतही कार्यक्रम सुरळीत पार पडला. तालुक्यातील प्रत्येक गावात हनुमान मंदिर असल्यामुळे या उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण आष्टी तालुक्यात भक्तीचे उधाण आले होते. दर्शनासाठी लागलेल्या रांगा, भजन-कीर्तनांचा नाद आणि सर्वत्र दिसणारा उत्साह यामुळे तालुक्यात आनंद आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# आष्टीत राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृहाचा भव्य लोकार्पण सोहळा

## मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-तानाजी जंजीरे

आष्टी - (राजेंद्र लाड) सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृह, आष्टी यांच्या वतीने जय जिजाऊ-जय शिवराय, मराठा तितुका मेळवावा हे ब्रीद घेवून सर्वांच्या उदात्त सहकार्यामुळे पुर्णत्वास आलेल्या या भव्य इमारतीचा रविवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भव्य लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा वसतिगृहाच्या प्रांगणात मोठ्या दिमाखात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री इं. विजयकुमार घोगरे हे राहणार आहेत. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष युगपुरुष इं. शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेब, मा. आ. रेखाताई खेडेकर यांच्या शुभहस्ते लोकार्पण सोहळा होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते आ. शिवश्री इं. सुरेश (अण्णा) धस, बीड चे खासदार शिवश्री बजरंग (बप्पा) सोनवणे, पदविधर मतदार संघाचे मराठवाड्याचे आ. शिवश्री सतिषभाऊ चव्हाण यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमास शिवश्री साहेबराव दरेकर नाना (मा. आमदार), शिवश्री इं. व्यंकटराव गायकवाड (मा. मुख्य सचिव, जलसंपदा), शिवश्री बाळासाहेब आजबे काका (मा. आमदार), शिवश्री भीमराव धोंडे साहेब (मा. आमदार), शिवमती शालिनीताई विखे पाटील (मा. जि.प.अध्यक्ष), शिवश्री इं. नवनाथ घाडगे (प्र. कार्याध्यक्ष, मराठा सेवा संघ, महा.), शिवश्री अर्जुनराव तनपुरे (जेष्ठ मार्गदर्शक, मराठा सेवा संघ, महा.), शिवश्री मनोज (दादा) आखरे (प्र.अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, महा.), शिवमती सीमाताई बोके (प्र.अ. जिजाऊ ब्रिगेड, महा.), शिवमती वर्षाताई माने (प्र.उ. जिजाऊ ब्रिगेड, महा.), शिवश्री इं. रोहिदास लांडगे (मा.का. संचालक, विदर्भ खोरे), शिवश्री इं. अविनाश सुर्वे (मा.का. संचालक, विदर्भ खोरे), शिवश्री इं. हेमंत धुमाळ (कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे), शिवश्री इं. भारत शिंगाडे (अधिक्षक अभियंता, छ. संभाजीनगर), शिवश्री इं. चंद्रशेखर शिखरे (प्र.महासचिव, मराठा सेवा संघ, महा.), शिवश्री अशोक ठाकरे (वि. अध्यक्ष, बीड-धाराशिव), शिवश्री धनंजय शेंडगे (जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, बीड), शिवश्री पुरुषोत्तम जाधव (प. संघटक, मराठा सेवा संघ, महा.), शिवश्री इं. कृष्णा घुगे (का.अ.नांदुर, मदमेश्वर) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिकच प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे.

कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी यासाठी तानाजी जंजीरे (तालुकाध्यक्ष, मराठा सेवा संघ, आष्टी) व भास्कर निंबाळकर (सचिव, मराठा सेवा संघ आष्टी) हे परिश्रम घेत असून, स्थानिक कार्यकर्ते, माजी विद्यार्थी व समाजबांधव यांचा मोठा सहभाग आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, स्वागत, सन्मान, नियोजन व व्यवस्थापन या सर्व बाबींची बारकाईने तयारी सुरू आहे. याप्रसंगी महाराष्ट्रातील नामवंत शिवशाहीर स्वप्निल डुंबरे यांचा शाहिरी पोवाड्याचा कार्यक्रम होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्याच्या माध्यमातून समाजातील गुणी व्यक्तींना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कार्याचा सन्मान करणे आणि नव्या पिढीला प्रेरणा देणे हा मुख्य उद्देश आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक जाणीव व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

या कार्यक्रमामुळे आष्टी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रेरणादायी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व सर्व कक्षाचे पदाधिकारी तसेच सदस्य यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जाफराबाद खरेदी विक्री ऑफिसमध्ये भोंगळा कारभार

## दलाला मार्फत होणारे खरेदी दस्त व मुद्रांक जास्ती भावाने विक्री

जाफराबाद प्रतिनिधी :- दि.८ तालुक्यात दिवसेंदिवस शासकीय कार्यालयामध्ये होणारे भ्रष्टाचार हे वाढत चालले असून कोणीही तालुक्यावर लक्ष देत नाही तर जिल्ह्यावरचे अधिकारी लक्ष देणार का की जनतेच्या अपेक्षा भंग केला जाणार आहे.

जाफराबाद खरेदी ऑफिस मध्ये दलाला मार्फत होणारे खरेदी खत दस्त बंद करण्याबाबत व आपल्या तालुक्यात असलेले मुद्रांक विक्री परवाना असलेले गैरवापर करीत असल्याबाबत निवेदन देण्यात आले आहे. आपल्या ऑफिसमध्ये दलाला मार्फत होणाऱ्या खरेदी खत दस्त शेतकऱ्यांना लूट करीत आहे. आपल्या नावाने जास्तीचे पैसे घेतात व आमच्याकडे खरेदी केली तरच खरेदी होतात तसे आम्हीच या ऑफिस करते धरते आहोत असे लोकांना भासवत आहे आपली पण या दलालांना संमती असल्याचे दिसत आहे आपणही दलाल आल्याशिवाय कामे करीत नाही असे शेतकरी व खरेदी विक्री करणारे लोकांचे म्हणणे आहे तसेच आपल्या तालुक्यातील मुद्रांक विक्रेते हे त्यांच्याकडे असलेल्या मुद्रांक विक्री परवान्याच्या गैरवापर करीत असून मुद्रांक नियमाप्रमाणे प्रत्यक्ष विक्री न करता आपल्या ऐवजी सदरील मुद्रांक दुसऱ्या व्यक्तीमार्फत जास्तीच्या भावाने विक्री करून लोकांची अडवणूक करीत आहे तसेच स्टॅम्प तिकीट हे सुद्धा मुद्रांक विक्रेते न विकता दुसऱ्या झेरॉक्स चालकांना व्यक्तीस जास्तीचे रक्कम घेऊन विकत आहे आणि झेरॉक्स वाले तिकीट सात रुपयाला विकत आहे तरी याच्यावर कारवाई करावी असे निवेदन मिलिंद दिलीप गायकवाड व मित्र मंडळ यांनी दिले आहे.



आम्ही या निवेदनावरून संबंधित मुद्रांक विक्रेते यांना नोटीस घेऊन खुलासा घेऊ व या ऑफिसमध्ये कोणीही दलाल येत नसल्याची माहिती दुय्यम निबंधक श्री वाढेकर यांनी दिली आहे.

आज आम्ही दिलेल्या निवेदनावर आठ दहा दिवसात कारवाई केले नाही तर आम्ही जिल्हा मुद्रांक अधिकारी जिल्हा मुद्रांक कार्यालय जालना येथे उपोषण करणार अशी माहिती मिलिंद दिलीप गायकवाड यांनी दिली आहे....

जाफराबाद तालुक्यात सर्व शासकीय कार्यालयामध्ये भ्रष्टाचार सुरू आहे परंतु जिल्हाधिकारी साहेब जाफराबाद तालुका कडे का लक्ष देत नाही याची विशेष चर्चा सध्या जाफराबाद तालुक्यासह चालू आहे...

# कारखानदाराकडून कोट्यावधीची ऊस देयक थकीत

## संतप्त शेतकरी करणार कारखान्यावर आक्रोश

बीड / प्रतिनिधी

मागील तीन साडेतीन महिन्यापासून जिल्ह्यातील अनेक ऊस कारखान्यांनी गाळप केलेल्या उसाचे शेतकऱ्यांना पैसे दिलेले नाहीत. वास्तविक पाहता पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांना ही ऊसाची रक्कम मिळणे अनिवार्य असताना ऊस कारखाना व्यवस्थापनाने अजून ही रक्कम शेतकऱ्यांना दिलेली नाही यामुळे ऊस उत्पादक शेतकरी संतप्त असून सनदशीर मार्गाने हा प्रश्न सोडविण्यात यावा अथवा दि ९ रोजी ऊस उत्पादक शेतकरी कारखान्यावर आक्रोश करणार असल्याची माहिती उत्पादक शेतकरी संघर्ष समिती कडून देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील तसेच जिल्हयाच्या सीमेवर असलेल्या परभणी जिल्ह्यातील साखर कारखान्याने जिल्हयातील असंख्य शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाला नेला. कायद्यानुसार ऊस गाळप पश्चात्य १५ दिवसात कारखाना प्रशासनाने ऊस देयक अदा करणे बंधनकारक असताना देखील असंख्य शेतकऱ्यांची कोट्यावधीची रक्कम साखर कारखानदाराने अद्याप ही शेतकऱ्यांना अदा केलेली नाही. प्रलंबित ऊस देयक अदा करण्यात यावेत याकरिता अखिल भारतीय किसान सभा, ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती मार्फत वेळोवेळी निवेदने, आंदोलने करण्यात आली मात्र अद्याप देखील शेतकऱ्यांना ऊस देयक प्राप्त झालेले नाही.

या सर्व विदारक परिस्थितीत ऊस हंगामाच्या सुरवातीला ऊस दर घोषणा आंदोलनावेळी ज्याप्रमाणे कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली, तशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये आणि शेतकऱ्यांनाही त्यांच्या प्रलंबित ऊस बिलाचे पैसे लवकरात लवकर मिळावेत याकरिता संघर्ष समिती मार्फत गुरुवार दि ९ रोजी ऊस गाळप करणाऱ्या सर्वच साखर कारखान्यावर ऊस उत्पादक शेतकरी धडक देत आक्रोश करणार आहेत.जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने पुढाकार घेऊन कारखाना व्यवस्थापन व ऊस उत्पादक संघर्ष समिती यांच्यात सुसंवाद घडवून आणावा आणि शेतकऱ्यांचा ऊस बिलाचा प्रलंबित प्रश्न सोडवण्यास मदत करावी अन्यथा निर्माण उद्भवना-या परिस्थितीस प्रशासन कारणीभूत असेल असे निवेदन वजा मागणी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती यांनी अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय बीड, परभणी यांच्याकडे केली आहे

# इन्स्टाग्राम आयडीवर अवैध पिस्टल व राऊंड चे व्हिडिओ विक्री करण्याच्या उद्देशाने इन्स्टॉग्राम पोस्ट करणाऱ्या ईसमावर कार्यवाही

नवीन नांदेड – इन्स्टाग्राम आयडीवर अवैध पिस्टल व राउंडचे व्हिडीओ विक्री करण्याचे उद्देशाने पोस्ट करणाऱ्या इसमांवर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड ,अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत अवैध गावठी पिस्टल बाळगणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करण्याचे सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते.नांदेड शहरात खुनासारख्या झालेल्या गंभीर घटनेच्या अनुषंगाने नांदेड शहरातील सराईत गुन्हेगारांचे सोशल मिडीया अंकाऊट व इंस्टाग्राम अंकाऊट तपासणी करीत असताना वर नमूद आरोपीच्या इंस्टाग्राम आयडीवरुन पिस्टल व राउंड चे व्हिडीओ विक्री करण्याचे उद्देशाने व सोशल मिडीया माध्यमांवर दहशत निर्माण करण्याचे उद्देशाने पोस्ट केल्याचे दिसून आल्याने वरील




आरोपीचा शोध घेतला असता तो इकबालनगर पाण्याचे टाकीजवळ संशयीत रित्या मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यांचे अंग झडतीत एक लोखंडी खंजर व एक रियलमी कंपनीचा मोबाईल मिळूण आला.

आरोपी शेख फरहान याच्या कडुन जप्त केलेल्या मोबाईल मधील इंस्टाग्राम आयडीवरुन सोशल मिडीयावर पिस्टल व राउंड चे व्हिडीओ विक्री करण्याचे उद्देशाने व सोशल मिडीया माध्यमांवर दहशत निर्माण करण्याचे उद्देशान व्हिडीओ पोस्ट केले आहेत व सदर व्हिडीओ मधील पिस्टल व राउंड हे आरोपी शेख अदिल याचे आहेत. आरोपी फरहान याने त्याचे इंस्टाग्राम आयडीवरुन बदला तो जरुर लेंगे अशी पोस्ट टाकुन शत्रुत्व, व्देष भावना, दुर्भावना निर्माण करण्याचे उद्देशाने खोटी विधाने, अफवा प्रसरीत केल्याने त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोकॉ सचिन चंद्रकांत चवरे पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे दिलेल्या फिर्यादीवरून वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक,नांदेड यांनी सदरची कामागिरी करणारे पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोलीस अमंलदार वसंत केंद्रे, मारोती पंचलिग,समिर अहेमद,शंकर माळगे,धमम्पाल कांबळे व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.



# भाजपा वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांच्या सत्कार

तामसा /प्रतिनिधी

तामसा येथे भारतीय जनता पार्टीच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ज्येष्ठ पदाधिकारी यांचा सत्कार, गौरव करण्यात आला.. यावेळी ज्येष्ठ पदाधिकारी माजी सरपंच विश्वंभर देशमुख,.विजय लाभसेठवार,निरंजन शिंदे,गणपत शेटे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर, डॉ.संदीप कारंजकर ,सखाराम डवरे,सरचिटणीस विशाल परभणकर,अरुण गायकवाड, शशिकांत बंडावार, नितीन फाळके, गजानन माने, नारायण कदम, लक्ष्मण पवार,अविनाश कदम, बालाजी लायेवार, आकास पवार, उत्तम सावकार उपस्थित होते.. भारतीय जनता पार्टीच्या वर्धापन दिनानिमित्त तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी आपल्या संकल्पनेतून तामसा येथील ज्येष्ठ निष्ठावंत पदाधिकाऱ्यांना सन्मानित

# भरधाव वेगात धावणाऱ्या हायवा टिप्पर वर आरटीओ व पोलीस प्रशासन आळा घालणार का

## उस्माननगर रोड वर गेल्या सात दिवसात निष्पाप दुसरा बळी

अनिल पाटील धमने
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

भरधाव वेगात धावणाऱ्या हायवा टिप्पर वर आरटीओ व पोलीस प्रशासनाने आळा घालणार का उस्माननगर रोड वर बारूळ येथील ज्येष्ठ विचारवंत शिवव्याख्याते, आणि सामाजिक-धार्मिक कार्यात अग्रेसर व्यक्तिमत्त्व ह.भ.प.मधुकर निवृत्ती कदम बारूळकर महाराज वय वर्ष ५४ यांचे दि ३१ मार्च रोजी नांदेड ते बारूळ कडे मोटार सायकल ने जात असताना ढवळे कॉर्नर समोर उस्मान नगर रोड वर भरधाव वेगात जाणाऱ्या टिप्पर च्या वाहनाने जोरात धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला तर दि ६ एप्रिल रोजी उस्मान नगर रोड वर सुप्रिम गोल्ड कंपनी समोर भरधाव वेगात जाणारे टिप्पर ने गोपाळचावडी येथिल रहिवाशी संतोष दत्तात्रय लघुळे वय ३७ वर्षे हा तरुण आपल्या स्कुटीवर येत असताना भरधाव वेगात असणाऱ्या टिप्पर ने जोराची धडक दिल्याने संतोष लघुळे याचा जागीच मृत्यू झाला असून गेल्या सात दिवसात टिप्पर च्या धडकेने निष्पाप दुसरा बळी गेला असुन





आणखी किती बळी घेणार हे हायवा टिप्पर त्या साठी या चालका कडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसते कारण आशा आणखी किती घटना घडणार आणि किती निष्पापाचा बळी जाणार त्या मुळे टिप्पर चालकांवर व मालकांवर प्रशासनाने कठोरातील कठोर कारवाई करावी कारण यापुढे कुण्या निष्पापा चा बळी जाणार नाही याकडे लक्ष द्यावे असे मत अनेक सर्व सामान्य नागरीकांतुन प्रशासनावर तिव्र शब्दात रोष निर्माण झाला असल्याचे दिसून येत आहे संतोष लघुळे यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी आई वडील दोन बहिनी असून तो घरातील करता मुलगा व एकुलता एकच मुलगा असल्याचे समजत असून त्याच्या निधनाने परिवारावर दुखाचा डोंगर कोसळला आहे त्याच्या आपघाताची बातमी कळताच गोपाळचावडी येथिल पोलीस पाटील प्रतिनिधी विजय खटके यांनी जागेवर जाऊन पोलीस प्रशासनास कळवले व या समयी सहकार्य केल्याचे दिसून आले .

# दु:खाच्या डोंगराखाली जन्मला माणुसकीचा नवा 'झरा'; अपघातात पती गमावलेल्या शितलचा दीराशी विवाह!

लोहा /प्रतिनिधी

नियतीचा घाला जेवढा भीषण असतो, तेवढाच मानवी मनाचा मोठेपणा हा आशेचा किरण देणारा असतो. लोहा तालुक्यातील भारसवाडा येथे याचीच प्रचिती आली. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी सौभाग्य लाभलेल्या शितलने अपघातात पती गमावला, पण कुटुंबाचे छत्र हरवू नये म्हणून भारसवाडा ग्रामस्थांनी पुढाकार घेत एक नवा आदर्श निर्माण केला. पतीच्या निधनानंतर विधवा झालेल्या शितलचा विवाह नवऱ्याचा लहान भाऊ (दीर) राजेश्वर याच्याशी लावून देत समाजात संवेदनशीलतेचा नवा वस्तुपाठ घालून दिला आहे.

नियतीचा क्रूर घाला

भारसवाडा येथील संतोष सुभाष धनुरे वय २४ यांचा संसार नुकताच सुरू झाला होता. २१ मार्च रोजी परभणी जिल्ह्यातील राहटी फाटा येथे झालेल्या एका भीषण अपघातात संतोषचा दुर्दैवी मृत्यू झाला. केवळ सहा महिन्यांपूर्वीच शितल आणि संतोषचा विवाह झाला होता. या अपघाताने दोन्ही कुटुंबांवर दु:खाचा



भारसवाडा ग्रामस्थांनी जपली सामाजिक बांधिलकी; भावूक वातावरणात सोहळा संपन्न

डोंगर कोसळला. अत्यंत हृदयद्रावक बाब म्हणजे शितल सध्या तीन महिन्यांची गर्भवती आहे. वडिलांचे छत्र हरवलेल्या त्या न जन्मलेल्या बाळाचे आणि शितलचे भविष्य काय, हा गंभीर प्रश्न उभा ठाकला होता.

रूढी-परंपरांना छेद, माणुसकीची साद

अशा कठीण प्रसंगी गावातील माजी सरपंच पप्पू पाटील हालगे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी दोन्ही कुटुंबांचे सांत्वन करत शितलचा पुनर्विवाह संतोषचा धाकटा भाऊ राजेश्वर याच्याशी करण्याचा प्रस्ताव मांडला. सुरुवातीला जुन्या रूढी-परंपरांमुळे संभ्रम निर्माण झाला, मात्र मुलाचे भविष्य आणि कौटुंबिक नाते टिकवण्यासाठी समाजातील तरुणांनी आणि ज्येष्ठांनी समजूत काढली. अखेर दोन्ही कुटुंबांनी भविष्याचा विचार करून या प्रस्तावाला संमती दिली.

गावाकडून संसाराची पाठराखण

५ एप्रिल रोजी हा विवाह सोहळा साध्या पण मंगलमयी वातावरणात पार पडला. विशेष म्हणजे, या विवाहाचा संपूर्ण खर्च माजी सरपंच पप्पू पाटील हालगे यांनी उचलला. यावेळी संपूर्ण गावाला महाप्रसादाचे (अन्नदान) आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक कार्यात सरपंच मारोतराव पाटील एडके, तंटामुक्ती अध्यक्ष बाबाराव हालगे आणि ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

एका तरुण लेकीचे आयुष्य अंधकारमय होऊ नये आणि न जन्मलेल्या बाळाला पितृप्रेम मिळावे, या उद्देशाने आम्ही हा निर्णय घेतला. भारसवाड्याने दिलेला हा संदेश समाजातील अनिष्ट प्रथांना छेद देणारा ठरेल. - पप्पू पाटील हालगे, माजी सरपंच

आज भारसवाडा गावाने दाखवलेले हे धैर्य आणि सामाजिक ऐक्य जिल्हाभर चर्चेचा विषय ठरत असून, या नवदाम्पत्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# किनवट येथे 'नारी स्वास्थ्य संवाद' उपक्रमातून किशोरींमध्ये आरोग्य जनजागृती

किनवट प्रतिनिधी दि.०७ : दुर्गा फाउंडेशन, किनवट यांच्या वतीने 'नारी स्वास्थ्य संवाद' या महत्वाच्या उपक्रमाचे आयोजन येथील सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या माध्यमिक विद्यालयात करण्यात आले. किशोरवयीन मुलींमध्ये शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी फिट इंडिया अभियानांतर्गत प्रमाणित हेश्रळीींळल हशरश्रींह लेरलह श्वेता चांदपूरकर या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी किशोरवयीन मुलींच्या आरोग्याशी संबंधित विविध मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन केले. विशेषतः वयात येताना शरीरात होणारे बदल, योग्य आहार, मानसिक स्वास्थ्य, तसेच स्वच्छतेचे महत्त्व याबाबत त्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला.

नागपूर येथे करण्यात आलेल्या किशोरवयींन मुलींच्या सर्वेक्षणाच्या आधारे किनवटमध्ये हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. भारतीय संस्कृतीत अनेकदा किशोरवयीन मुलींच्या लैंगिक व शारीरिक आरोग्याशी संबंधित विषयांवर खुलेपणाने चर्चा होत नाही. परिणामी, १३ ते १८ वयोगटातील मुलींना आवश्यक माहिती वेळेवर मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन दुर्गा फाउंडेशनने या चर्चासत्राचे आयोजन केले.

या सत्रातून मुलींना त्यांच्या आरोग्याबाबत योग्य माहिती मिळाली असून, पुढील काळात दुर्गा फाउंडेशनच्या माध्यमातून गायनॉकॉलॉजिस्ट, न्यूट्रिशनिस्ट तसेच इतर आरोग्य तज्ज्ञांच्या




मार्गदर्शनाखाली आणखी सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली असून, भविष्यातही असे उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. या उपक्रमात सुमारे ३०० मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता राठोड, दुर्गा फाउंडेशनच्या दुर्गा सुधाकर भोयर, तसेच शिक्षकवृंद यांची उपस्थिती

# तिनं चार दिवसांपूर्वीची तिनं बोटी उडवली मात्र अंतरगाव येथे अवैध वाळू उपसा जोमात सुरूच

नायगाव प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील अंतरगाव येथे अवैध वाळू उपसा जोमात सुरू कुंटुर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल भोसले व ऊसमानगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संजय निलपत्रेवार व

नायगाव च्या तहसिलदार डॉ. धमप्रिया गायकवाड यांनी तिनं बोटि उडवून देत कारवाई केली होती मात्र दुसऱ्या तिसऱ्या दिवशी अवैध वाळू उपसा जोमात सुरू झाले आहे नायगाव तालुक्यातील गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी व दिवसा वाळू , चोरी करणाऱ्याना वाळू माफियांना रान मोकळी केलीय काय अंतरगाव येथील तलाठी मंडळ अधिकारी यांचा आशिर्वाद आहे अशी चर्चा दपक्या आवाजात सुरू आहे . येथील वाळु माफीयांनी चोरी व तस्करी वाढली आहे.

या माफियांना ना कोणाचा धाक राहिला , ना कुणाची भिती महसूल विभागाच्या वाळू माफिया रात्रीच्या दिवसाढवळ्या चालू आहे वाळूची चोरी करून खुले आम वाहतूक करत आहेत.

तालुक्यातील वाळू रात्रीला व दिवसात मोठ्या प्रमाणात नायगाव तालुक्यातील भागातून अंतर्गत असलेल्या गावात नायगाव तहसिलचा अनागोंदी कारभारामुळे वाळू व अवैध वाहतूक होत आहे. ती वाळू टिप्परमधून वाहतूक करुन विक्री केली जात आहे.गोदावरी पात्रातून दिवसाढवळ्या वाळू काढल्या जात आहे. चोरीने काढलेली वाळू नायगावच्या तहसीलदार यांनी चोरट्या मार्गाने वाळूचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्यांना रान मोकळे सोडले आहे. काय ? आशी चर्चा परिसरात सुरू आहे या सर्व बाबींकडे.पोलीस अधिक्षक नांदेड अबीनाश. कुमार व तहसीलदार डॉ . धमप्रिया गायकवाड याकडे लक्ष देऊन तत्काळ बंदोबस्त करण्याची मागणी परिसरात गावकऱ्यांनी केली आहे. मंडळी अधिकारी यांना याबाबत माहिती विचारणा केली असता माहिती घेऊन सांगतोय म्हणून फोन कट केला व उडवा उडवीचे उत्तर दिले जात आहे . अंतरंगात येथील तलाठी यांना फोन करून विचारले असता माहिती घेऊन सांगतोय म्हणून त्यांनी पण उडवा उडवीची करत फोन ला प्रतिसाद दिला नाही मंडळ अधिकारी व तलाठी यांना माहिती नसता अवैध वाळु उपसा कसा ? या दोघांच्या आर्थिक ? व्यवहारा मुळेच यांनी माहिती नाही का परिसरातील नागरीकांतुन चर्चांना उधान आले आहे

# जुनापानीच्या दिशाचा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश

किनवट (प्रतिनिधी) दि . ०६ : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील कृषी अधिकारी श्री. अमित पवार यांची कन्या कु. दिशा पवार हिने आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित डेप्वेप डलहेश्र ्ष एलेपोळली (ङडए) या संस्थेत चडल ळप एलेपोळली षी खपींशीपरींळेपरश्र ऊर्शींशश्रेशिपीं या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला आहे. कठीण प्रवेश प्रक्रियेत तिने यश संपादन केले असून पुढील दोन वर्षांच्या शिक्षणासाठी भारत व ब्रिटिश सरकारच्या संयुक्त शिष्यवृत्तीचा लाभ तिला मिळणार आहे.

कु. दिशा पवार हिने पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये इंग्रजी, अर्थशास्त्र व



राज्यशास्त्र या विषयांसह पदवी शिक्षण पूर्ण केले आहे. मागील वर्षभर ती या प्रवेशासाठी सातत्याने तयारी करत होती. नुकताच तिच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यात तिने यश मिळवले.

दिशाच्या या यशामागे तिची मेहनत तसेच आई अनिता पवार व वडील अमित पवार यांचे मार्गदर्शन आणि त्याग महत्त्वाचा ठरला आहे. शिक्षणासाठी कुटुंबाला नांदेड, दिल्ली, हैदराबाद आणि पुणे अशा विविध ठिकाणी स्थलांतर करावे लागले होते.

माहूर तालुक्यातील डोंगराळ भागातील जुनापानी येथील रहिवासी असलेल्या दिशाच्या या यशामुळे जिल्ह्यासह ग्रामीण, आदिवासी व तांड्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. तिच्या या कामगिरीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

# किनवट शहरात कोणत्याही प्रभागात पाणी टंचाई जाणवणार नाही पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी यांचे आश्वासन ; युद्धस्तरावर दुरुस्ती कामे सुरु

किनवट /प्रतिनिधी

उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणीटंचाईची समस्या उग्र रूप धारण करते. मात्र, यंदा किनवट शहरातील कोणत्याही प्रभागात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भासू नये, पाण्याची गळती थांबावी आणि पाण्याचा अपव्यय टाळला जावा, यासाठी नगर परिषदेने कंबर कसली आहे. नगराध्यक्षा सौ सुजाता एंड्रलवार यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी यांनी शहरातील प्रत्येक प्रभागात पाणीपुरवठा दुरुस्तीची कामे युद्धस्तरावर हाती घेतली आहेत. या कामामुळे दरवर्षी पाणीटंचाईमुळे त्रस्त असलेल्या जनतेला दिलासा मिळाला असून नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

दरवर्षीच किनवट शहरातील अनेक प्रभागात उन्हाळ्याच्या दिवसात पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असते मात्र यावर्षी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी यांच्या सूचनेनुसार नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी शहरातील ज्या ठिकाणी पाईपलाईनला गळती लागली आहे किंवा सार्वजनिक नळांना तोट्या नसल्यामुळे पाणी वाया जात आहे, अशा सर्व ठिकाणी नवीन तोट्या बसवण्याचे काम वेगाने सुरू केले आहे.'पाण्याचा प्रत्येक थेंब वाचला पाहिजे' या उद्देशाने ही मोहीम राबवली जात आहे. प्रत्यक्ष प्रभागात जाऊन घेतला आढावा घेतला असता तोट्या नसलेल्या नळातून गेल्या कित्येक वर्षांपासून दररोज हजारो लिटर पाण्याची नासाडी होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली. भर उन्हाळ्यात होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ज्या भागात कमी दाबाने पाणी येते किंवा तांत्रिक अडचणी आहेत, त्या त्वरित सोडवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या असुन मागील आठ दिवसाच्या कालावधीत जवळपास ५०० पेक्षा अधिक नळांना मजबूत व दर्जेदार तोट्या बसविल्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होऊ लागली आहे.

उन्हाळ्यात शहरवाशीयांना पाण्याची समस्या उद्भवु नये यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. गळती रोखून प्रत्येक घरापर्यंत मुबलक आणि सुरळीत पाणीपुरवठा करणे हाच आमचा ध्यास आहे. आवश्यकतेनुसार बोअरवेल व पाण्याचे टँकर सुद्धा उपलब्ध करून देणार.

निलोफर निसार भाटी
पाणीपुरवठा सभापती न प किनवट



दरम्यान प्रशासनाने उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच दाखवलेली ही तत्परता पाहून किनवटचे नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. प्रत्यक्ष जागेवर येऊन समस्या जाणून घेणे आणि नळांना तोट्या बसवून पाणी गळती थांबवल्यामुळे स्थानिक रहिवाशांनी पाणीपुरवठा सभापती निलोफर भाटी व नगर परिषदेच्या कार्याचे कौतुक केले आहे.

या मोहिमेमुळे कडक उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.